बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के


बीड | सोमवार, दि.३०सप्टेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक५९वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## अज्ञात माथेफिरुचा खोडसाळपणा

सिरसाळा : गावच्या मूलभूत/भौतिक सुविधेत अडचण निर्माण व्हावी या हेतूने अज्ञात माथेफिरुने सिरसाळ्यातील पाणी पुरवठा करणा–या तेलगाव रोड नजीकच्या बुरजी तलावातील पाणी पुरवठ्याचे मोटार स्टार्टर दगड घालून फोडले आहे . हि घटना दिनांक २८ रोजी घडली आहे . सरपंच अन्वर पट्टेदार यांनी हे स्टार्टर दुरुस्त केले .परंतु दुसऱ्या दिवशी पुन्हा काल दिनांक २९ रोजी दुरुस्त केलेले स्टार्टर फोडले आहे ,फेकून दिले आहे . हा जाणूनबुजून कुणाच्या सांगण्यावरून हा खोडसाळ पणा अज्ञात माथेफिरू करत आहे. या प्रकरणी सरपंच अन्वर पट्टेदार यांच्या सुचनेवरुन ग्रामपंचायत कर्मचारी राहूल अर्जून घुंबरे यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

# गद्दारांना ५० खोके आणि लाडक्या बहिणींना फक्त!

## राजकारण: उद्धव ठाकरेंचा भाजपाला सवाल





मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

अदाणीला सगळं द्यायचं हे मुंबईत चाललं आहे असं मला वाटलं होतं पण आज बातमी वाचली की चंद्रपूरची एक शाळा ती पण अदाणींना देऊन टाकली. अदाणी म्हणजे राष्ट्र संत आहेत का? जय देव जय देव जय अदाणी बाबा अशी आरती वगैरे गाणार आहेत की काय? हे सगळे? बाकीचे लोक नाहीत? वन नेशन वन इलेक्शन नाही, वन नेशन वन कॉंट्रॅक्टर ही या मोदींची धारणा आहे. एकच कंत्राटदार त्यालाच सगळी कामं देत आहेत. आमच्यावर जेव्हा घराणेशाहीची टीका करता तेव्हा तुम्हाला सांगू इच्छितो की मी कुटुंबवत्सल आहेच. त्यामुळेच करोना काळात माझे कुटुंब माझी जबाबदारी योजना आणली होती. कारण मला कुटुंब सांभाळायचं आहे माझ्या समोर माझं कुटुंबच बसलं आहे. असं उद्धव ठाकरे म्हणाले.

### लाडकी बहीण योजनेवर उद्धव ठाकरेंची टीका


गद्दारांना ५० खोके आणि आम्हाला १५०० रुपये असं महिला सांगतात. २०१४ ला मोदी यांचा आम्ही प्रचार करतो होतो. १५ लाख देणार होते. त्याचे १५०० का झाले? लाडकी बहीण योजनेचे पैसे काय तुमच्या खिशातले नाहीत. जनतेचेच पैसे तुम्ही देत आहात. असंही उद्धव ठाकरे म्हणाले. आम्हाला गद्दारांची कमाई नको आहे. मी म्हणजे कुणीतरी आहे असं त्यांना वाटतं आहे. दिल्लीत जाऊन मोदी–शाह यांच्यासमोर कटोरा महाराष्ट्र पसरणार नाही. मिंधे म्हणजे महाराष्ट्र नाही, गुलाबी जॅकेट म्हणजे महाराष्ट्र नाही. महाराष्ट्राची जनता माझ्या समोर बसली आहे. असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

### माझे कुटुंब, माझी जबाबदारी ही योजना जबाबदारीने आणली

मी एक घोषणा दिली होती की माझे कुटुंब माझी जबाबदारी कारण महाराष्ट्र माझं कुटुंब आहे. मधे पेव फुटलं होतं मोदी परिवारचं. ते तर इकडे तिकडे फिरत आहेत. त्यांना परिवार आहेच कुठे? छत्रपती शिवरायांना आग्र्याला नजरकैदेत जावं लागलं. त्याचं कारण मिर्झा राजे जयसिंग होते. शिवराय औरंगजेबासमोर झुकले नाहीत आम्ही या अब्दाली समोर झुकणार आहोत का? असाही प्रश्न उद्धव ठाकरेंनी विचारला. अमित शाह मला आणि शरद पवार यांना संपवायला येणार आहे, तुम्ही संपवू देणार का? मी सरळ सांगतो मला संपवायचं असेल तर जनता संपवेल. मला जर दिल्लीहून सांगणार असतील उद्धव घरी बस तर जनता त्यांना घरी बसवेल असाही टोला उद्धव ठाकरेंनी लगावला.

# केजध्ये अल्पवयीन मुलीवर अत्याचार!

## खळबळ:वस्तीगृहात राहणाऱ्या मुलीवर अत्याचार



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

वसतिगृहात राहून शिक्षण घेत असलेल्या मुलीला बाहेर बोलावून तिला दोघांनी मोटार सायकल बसवून एका लॉजच्या पाठीमागे मोकळ्या जागेत नेवून तिच्यावर ओळखीच्या एकाने बलात्कार केल्याची खळबळजनक घटना घडली असून ती अल्पवयीन मुलगी एक महिन्याची गरोदर असल्याचीही माहिती समोर येत आहे.बीड तालुक्यातील एक महिला ही तिचा नवरा दारू पीत असल्याने नवऱ्याशी पटत नसल्याने मागील दहा वर्ष पासून एक मुलगी व मुलांसह माहेरी राहत आहे. तिची साडे चौदा वर्ष वयाची मुलगी केज येथील कन्या प्रशाला केज येथे ७ वी पासून शिक्षण घेत आहे. ती आता ९ वी मध्ये शिक्षण घेत आहे. ती मुलींचे वस्ती गृहात राहून शिक्षण घेत आहे.दरम्यान त्या अल्पवयीन मुलीच्या आजोळा शेजारी राहत असलेला सनि उर्फ स्वप्नील पाडळे याची चांगली ओळख आह. ती मुलगी गावाकडे अधुन मधुन गेल्या नंतर तो तिच्या आईचे मोबाईलवर फोन करीत असे. त्यामुळे त्यांचे अधुन मधुन बोलणे होत असे. असायचे त्यामुळे त्याची व त्या मुलीची मैत्री होती.

दि. २१ सप्टेंबर रोजी वस्तीगृहाला सुट्टी असल्यामुळे ती आजोळी आईकडे गेली होती.त्या नंतर दि. २४ सप्टेंबर रोजी मुलीच्या तिच्या आईने तिला सकाळी १०:०० वस्तीगृहा मध्ये सुमारास आणून सोडले. त्या नंतर थोड्याच वेळात १०:१५ वाजता सनि उर्फ स्वप्नील पाडळे व अमोल अंकुश जाधव हे वस्तीगृहाचे बाहेर आले. ते म्हणाले की, तुझे दुखत असल्यामुळे तुझ्या मामाने तुला सरकारी दवाखाना केज येथे बोलवले आहे. असे खोटे बोलुन त्यांनी तिला त्यांचे मोटार सायकलवर बसवुन केज येथील अंबाजोगाई रोडवरील सुजीत लॉजच्या पाठीमागे नेले. तीला व सन्नी उर्फ स्वप्नील पाडळे याला त्या ठिकाणी सोडुन अमोल अंकुश जाधव निघुन गेला. त्या नंतर ती मुलगी सन्नी उर्फ स्वप्नील पाडळेला म्हणाले की, मला येथे कशाला आणले? तेव्हा तो पान २ वर...

# त्याशिवाय सशक्त राष्ट्रनिर्मिती शक्य नाही

## राज्यपाल: सी.पी राधाकृष्णन: कृषी पुरस्कार वितरण



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या योगदानाशिवाय कोणताही सशक्त समाज आणि राष्ट्र निर्माण शक्य नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र सरकार कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी व्यक्ती संस्था तसेच अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येणारे कृषी पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम मुंबईतील वरळी येथील नॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या हॉलमध्ये पार पडला. या भव्य दिव्य कार्यक्रमात सन २०२०, २०२१ व २०२२ या ३ वर्षातील एकूण ४४८ पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यावेळी राज्यपाल महोदय बोलत होते.

ते पुढे म्हणाले, देशातील १४० कोटी लोकांना शेतकऱ्यांशिवाय भविष्य नाही. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पाठीशी शेतकरी पान २ वर...

# देवी भक्तांचा दर्शनाचा मार्ग झाला सुकर

## तत्पर: जयदत्त क्षीरसागर यांच्या माध्यमातून प्रश्न तडीस



बीड /पुण्यभूमी प्रतिनिधी

श्री तुळजा भवानी खासबाग देवी मंदिर बीड कडे जाणारा मुख्य रस्ता भाजी मार्केट – देवी मंदीर रस्त्याचे काम चालू झाले आहे.

मागील बरेच दिवसांपासून या रस्त्याचे काम चालू होते पण नवरात्र उत्सव जवळ येत असून येत्या ३ तारखेपासून नवरात्र उत्सवाला सुरूवात होत आहे. खासबाग देवीला दर्शनाला येणार्या भाविक भक्तांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. भाजी मार्केट ते मंदिराकडे येणार्या रस्त्याच्या पान २ वर...

# नंदू मुंदडा भलताच करामती माणूस!

## ज्ञानोबा कांबळे म्हणाले: नंदू मुंदडा, अक्षय मुंदडासह दोषींवर ट्रोसिटी दाखल करा



अंबाजोगाई/पुण्यभूमी प्रतिनिधी महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ख्याती देशासह संपूर्ण जगभर आहे. अनेक देशांत छत्रपती शिवाजी महाराज आणि बाबासाहेबांची जयंती मोठ्या उत्साहात साजरा केली जाते. राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री देखील त्यांच्या कार्याला सलाम करीत नतमस्तक होतात. परंतू, अंबाजोगाई तालुक्यातील एका ग्रामपंचायतीमध्ये लाजीरवाणा प्रकार उघडकीस आला होता. छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मधोमध चक्क एका माजी मंत्र्यांचा फोटो लावण्यात आला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या आरक्षणावर निवडून यायचं आणि त्यांच्याच बाजूला फोटो लावायचा ही निषेधार्ह घटना जोगाईवाडी / चतुरवाडी ग्रामपंचायतीमध्ये घडली होती. या घटनेमुळे केज मतदारसंघातील जनतेमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली होती. या घटनेला आता एक वेगळेच वळण पान २ वर...

राजेंद्र मस्के | मराठवाडा केसरीचा मानकरी आर्यन फिरंगे

# बैलगाडा शर्यतीने इतिहास घडवला



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष, राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या वतीने बीड येथे आयोजित भव्य मराठवाडा केसरी बैलगाडा शर्यत सुमारे पन्नास हजार प्रेक्षकांच्या साक्षीने संपन्न झाली. राजेंद्र मस्के यांच्या नियोजनातून बैलगाडा शर्यतीचे मैदानाला भव्य स्वरूप आले. उत्तम व पारदर्शकपणे स्पर्धांचे नियोजन करून स्पर्धकांना सन्मानपूर्वक शर्यतीत संधी दिली. गेल्यावर्षी पेक्षा यावर्षी या मैदानाला जत्रेचे स्वरूप आले होते. मराठवाड्यातील बीड येथे झालेल्या मराठवाडा केसरी मैदानाने इतिहास घडवला.

प्रथम बक्षीस सोनालिका ट्रॅक्टर, – आर्यन गणेशशेठ फिरंगे धनगरवाडी ता. बीड यांच्या बकासुर व सर्जा बैलजोडीने साहसाने शर्यत जिंकून मराठवाडा केसरीचा मान पटकवला. तर पुढील बैलगाडा स्पर्धकांनी सहा रोख बक्षिसांचा मान पटकावला. द्वितीय बक्षीस, संजय जाधव – जालना, तृतीय बक्षीस – बापासाहेब इंदुरे, बीड, चौथे बक्षीस – बापूराव चव्हाण, नीरा, पाचवे बक्षीस – शिला गणेशशेठ फिरंगे, धनगरवाडी, सहावे बक्षीस– बुरा भाऊ शिंदे चाळीसगाव, सातवे बक्षीस – समीर पटेल ,संभाजी गीते शंकरापूर सर्व विजेत्यांचा ढाल, पुष्पगुच्छ व पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. महाराष्ट्रातील जळगाव, चाळीसगाव, छत्रपती संभाजीनगर, पुणे, इंदापूर, नगर, कल्याण, परतूर, ठाणे, सासवड, पुरंदर. बारामती, पान २ वर...

# भोतमांगे परिवाराच्या झोपडीचे रुपातर स्मारकात करा

## ॲड. प्रकाश आंबेडकर : खैरलांजी हत्याकांडाला १८ वर्ष पुर्ण



नगर/पुण्यभुमी प्रतिनिधी

दलितांना, विशेषत: दलित महिलांना नाकारलेला न्याय आणि दलितांवरील प्रचलित जाती–आधारित अत्याचारांची आठवण म्हणून भोतमांगे कुटुंबाच्या झोपडीचे रूपांतर स्मारकात करावे, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी ट्विटच्या माध्यमातून केली आहे.

ॲड. आंबेडकर म्हणाले की, आज भोतमांगे यांची झोपडी रिकामी पडून आहे. खैरलांजी हत्याकांडातील गुन्हेगार, पोलीस, काँग्रेस, राष्ट्रवादीचे शक्तिशाली राजकारणी हे सगळे अत्यंत क्रूर, अमानवी आणि रानटी जातीय हिंसाचार झाकण्यात आणि भोतमांगेना न्याय मिळू नये यासाठी प्रयत्न करत होते असा आरोपही त्यांनी तत्कालीन काँग्रेस – राष्ट्रवादी सरकारवर केला आहे.खैरलांजी जातीय हत्याकांडाला आज १८ वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. परंतु या घटनेने राज्यातच नव्हे, तर संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली होती. आंबेडकरवादी संघटना आक्रमक होत रस्त्यावर उतरून निषेध नोंदवत होते. या पार्श्वभूमीवर ड. आंबेडकर यांनी त्यांचे मत व्यक्त केले. पान २ वर...

## मतदारांसाठी सोयी सुविधा आवश्यक

महाराष्ट्र विधानसभेची मुदत येत्या २६ नोव्हेंबरला संपत आहे. त्यामुळे, पाच वर्षांनी होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीची घोषणा कधी होणार याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. राज्यात महायुती आणि महाविकास आघाडीकडून विधानसभेची जोरदार तयारी होताना दिसत आहे. भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुतीमध्ये शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन पक्ष असले तरी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने जनतेसमोर जाण्याची तयारी केली आहे. मात्र काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार गट) आणि शिवसेना (उबाठा गटा)मध्ये अद्याप मुख्यमंत्रीपदाचा चेहरा ठरलेला नाही. मुख्यमंत्री पदावरून महाविकास आघाडीमध्ये धुसफूस आहे. दुसऱ्या बाजूला 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'ला राज्यातील महिलांकडून जो चांगला प्रतिसाद मिळत आहे, त्यामुळे महायुतीला विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी कोणतीही भीती वाटत नाही. त्यात केंद्रीय निवडणूक आयोगाचे पथक दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आले आहे. या दोन दिवसांत केंद्रीय आयोगाकडून राज्यातील विविध राजकीय पक्ष, पोलीस तसेच जिल्हा प्रशासनासोबत बैठकाचा सिलसिला सुरू आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार तसेच निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंह संधू हे स्वत: आढावा घेत असल्याने राज्यातील सनदी अधिकारी आणि पोलीस प्रशासनांना कोणत्या सूचना देतात याकडे लक्ष लागले आहे.

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांच्या नेतृत्वाखालील राज्य निवडणूक आयोगाला सतर्क झाला आहे. पोलीस प्रशासनासोबत झालेल्या बैठकीत पोलीस व्हॅन आणि ॲम्बुलन्सच्या वाहनांच्या आडून रोख रकमेची ने-आण केली जाते, याकडे काळजीपूर्वक तपासणी करावी, अशा सूचना पोलिसांना देण्यात आल्या. सर्व नेत्यांचे/स्टार प्रचारकांचे हेलिकॉप्टर प्रोटोकॉलनुसार तपासले जायला हवे. कोणी कितीही मोठा नेता असला तरी सर्वांना समान वागणूक दिली पाहिजे, असेही मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी सांगितले आहे. तसेच, सर्व बँकांनी नियुक्त केलेल्या वाहनांमध्ये केवळ नियुक्त वेळेत पैसे हस्तांतरित करावेत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. इतर राज्यातून अमली पदार्थ साठा निवडणूक काळात येतो, असे प्रकार याआधी घडले असल्याने पोलिसांनी करडी नजर ठेवावी लागणार आहे. विशेषत: सोलापूर ते पुणे राष्ट्रीय महामार्गावर तपासणी आणि सतर्कता वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. इतर राज्यांमधून रेल्वे मार्गाने ड्रग्जचा साठा येऊ शकतो असा संशय असल्याने रेल्वे पोलीस दलाशी समन्वय ठेवून नाशिक आणि कल्याण रेल्वे स्थानकावर चेकिंग वाढवा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. नाशिक, पुणे आणि मुंबई विमानतळावर तपासणी कडक होणार आहे.

निवडणूक आयोगाच्या मुख्य आयुक्तांनी राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले. यात राजकीय पक्षांचा मतदारांची गाऱ्हाणी मांडण्यात भर होता हे ऐकून बरं वाटले. शेवटी मतदार राजा हाच मतदानाच्या दिवशी महत्त्वाचा घटक असला तरी, त्याला अनेक गैरसोयीला सामोर जावे लागल्याच्या तक्रारी लोकसभा निवडणुकीत पाहावयास मिळाल्या. अनेक निवडणूक केंद्राच्या बाहेर छप्पर नसल्याने रांगेत तासनतास उभे राहिलेल्या मतदारांना उन्हांचे चटके सहन करावे लागले. अनेक ठिकाणी ईव्हीएम धीम्या गतीने चालत असल्याने, मतदारांना लांबलचक रांगेत ताटकळत राहावे लागले होते.

# माजलगावची आरक्षण हक्क परिषद!

> मी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची घटनाही तयार केली आहे. त्याच्या प्रियांबलमध्ये स्वातंत्र्य,समता आणि मित्रत्व या तत्त्वावर हा पक्ष आधारलेला राहील असे स्पष्ट केले आहे. पार्लमेंटमध्ये येणाऱ्या प्रत्येक विधेयकाची कसोटी या तीन निष्कर्षावर पाहिली जाईल
> –डॉ बाबासाहेब आंबेडकर नागपूर येथे शाम हॉटेल पत्रकार परिषदे मध्ये सायंकाळी पाच वाजता दिनांक १३ ऑक्टोबर १९५६

संकलन:
**भगवान साकसमुद्रे**
८९९९३८००१७





बीड जिल्ह्याच्या क्रांतीभूमीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या ६८ व्या वर्धापन दिनानिमित्त डॉ राजरत्न आंबेडकर व मनोजदादा जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत आरक्षण हक्क परिषदेचे माजलगाव येथील वैष्णवी मंगल कार्यालयात दि ३० सप्टेंबर २०२४ रोजी आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विजय साळवे यांनी केले आहे. आपल्या भारत देशामध्ये दोन प्रवाह जोमाने काम करताना दिसत आहेत, एक प्रवाह आरक्षण समर्थक तर दुसरा आरक्षण विरोधी आहे. संविधानाला व मानवतेला स्थापित करण्यासाठी समविचारी प्रवाहाने एकत्र येणे काळाची गरज आहे. डॉ राजरत्न आंबेडकर यांना जेंव्हा प्रश्न विचारला की आज घडीला डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्षाचे पुनर्जीवन करण्याची काय आवश्यकता पडली ?तेव्हा ते म्हणाले की, रा.सू. गवई साहेबांचे निधन झाले आहे. मंत्री रामदास आठवले आणि प्रा जोगेंद्र कवाडे हे भाजपा सोबत गेले आहेत तर प्रकाश आंबेडकर वंचित बहुजन आघाडी चालवत आहेत. तेव्हा बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारावर चालणारा रिपब्लिकन पक्ष आज घडीला अस्तित्वात असल्याचे दिसून येत नाही. काही नेत्यांच्या करणी आणि कथनी मध्ये फरक आहे. ते सार्वजनिक बोलताना भाजपच्या विरोधात बोलतात, परंतु त्यांच्याच कृतीने भाजपाला फायदा पोचवतात. आज घडीला भाजप प्रणित महायुती आणि काँग्रेस प्रणित महाविकास आघाडी या दोन्ही आघाडीमुळे अनुसूचित जाती, जमाती आणि मुस्लिम यांच्या मतांचा केवळ निवडणुकी पुरताच वापर होतो. सत्तेत त्यांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात वाटा दिला जात नाही. कॉग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे हे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असून देखील ते पक्षाचे हाय कमांड होऊ शकत नाहीत. एक ऑगस्टच्या सर्वोच्च न्यायालयाचा अनुसूचित जाती जमातीच्या उप अनुसूचीकरण अथवा उप वर्गीकरण आणि अनुसूचित जाती जमातीला क्रिमिलेयर निकष लागू करण्यासंदर्भात आलेल्या निर्णयाच्या संदर्भात खर्गे स्वतः अनुसूचित जातीचे असल्याने विरोध करतात. परंतु त्यांच्याच पक्षाची सत्ता असलेले कर्नाटक आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री स्वागत करतात. या वर राहुल गांधी यांना प्रतिक्रिया देण्यासही वेळ नाही. यावरून असे स्पष्ट दिसते की ,पुणे करारामुळे अनुसूचित जाती जमातीच्या प्रतिनिधींना हाय कमांडच्या परवानगी शिवाय समाजाच्या हितासाठी तोंडच उघडता येत नाही. या देशात आजही जातीच्या नावाने भेदभाव केला जातो.संविधान विरोधी आर्थिक निकषांची मागणी केली जाते. ही परिषद आरक्षण हक्क परिषद असल्याने या परिषदेत मराठा जातीला आरक्षण देणे,पदोन्नती मधील आरक्षण,आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी, इतर मागास वर्गाची जातीनिहाय जनगणना, असंवैधानिक आर्थिक आधारावरील आरक्षण म्हणजेच ईडब्ल्यूएस समाप्त करणे, हे मुद्दे चर्चिले जातील, राजरत्न आंबेडकर आणि मनोज दादा जरांगे पाटील हे नेहमीच आरक्षणाच्या समर्थनार्थ मैदानात आंदोलन करत आलेले आहेत. आरक्षण हक्क परिषदेच्या निमित्ताने या सर्व मुद्द्यांना आधार बनवून जनतेमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी ही परिषद निर्णायक ठरणार आहे.राजरत्न आंबेडकर आणि मनोज दादा जरांगे पाटील जर आरक्षणाच्या समर्थनार्थ एकत्र मैदानात उतरले तर आरक्षणाच्या समर्थनार्थ मोठे आंदोलन उभे राहू शकते.या होणाऱ्या आरक्षण हक्क परिषदेस बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असणाऱ्या गोष्टी होणार का? काही नेते पुणे करारा संदर्भात खरी माहिती लपवत आहेत. शत्रूला अनुकूल अशीच कृत्य करताना दिसत आहेत.

## पान एक वरून

### केजध्ये अल्पवयीन मुलीवर

तीला म्हणाला की, तुझे मामा येणार आहेत. असे म्हणाला म्हणून ती त्याच्या सोबत तेथे थांबली. दिवसभर तीला तेथे बसवल्या नंतर बराच वेळ झाला; परंतु तीचा मामा आले नाहीत. तेव्हा ती त्याला म्हणाली की, मामा आले नाहीत. मला आता वस्तीगृहावर नेवुन सोड. असे म्हणताच तो तिला म्हणाला की, माझे तुझ्यावर प्रेम आहे. तु मला आवडतेस. असे म्हणुन त्याने तिच्या ईच्छे विरूध्द रात्री अंदाजे ९:०० वा. च्या सुमारास बळजबरीने शारीरीक संबंध केले. त्या नंतर तिने आरडा ओरडा केला; तेव्हा लॉज येथील दोन ईसम तेथे आले. त्यांनी तिला काय झाले? असे विचारले असता तिने त्यांना काही सांगीतले नाही. तिने आईला फोन लावायचा आहे असे म्हणाली. त्यापैकी एका जणाचे मोबाईल वरून तिने तिच्या आई फोन करून घटने बाबत संगीतले. त्या नंतर सनि उर्फ स्वप्नील याने तिला त्याचे मोटार सायकलवर दहीफळ फाटा येथे नेवून सोडले आणि तो तेथुन निघुन गेला. त्या नंतर ती मुलगी पायी चालत घरी गेली. रात्री उशीरा तिने हा प्रकार आई, मामा आणि नातेवाईकांना घडलेला सर्व प्रकार सांगीतला. त्या नंतर दिं. २६ सप्टेंबर रोजी केज पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून सन्नी उर्फ स्वप्नील पाडळे आणि त्याला मदत करणारा त्याचा मित्र अमोल जाधव यांच्या विरुद्ध गु. र. नं. ५१५/२०२४ भा. न्या. सं. १३७, ६४, ६५(१), ३(५) यासह बाल लैंगिक अत्याचार अधिनियम २०१२ चे कलम ४, ६, ८, १२, १७ नुसार गुन्हा दाखल आला आहे. या प्रकरणी पिंक पथकाचे पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके हे तपास करीत आहेत.

### त्याशिवाय सशक्त राष्ट्रनिर्मिती

ठामपणे उभा होता. त्यामुळे ते मोठा इतिहास रचू शकले, हा महाराष्ट्राचा महान इतिहास आहे. महाराष्ट्र राज्याने राबवलेली १ रुपयात विमा योजना ऐतिहासिक आहे, अशा शब्दात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी शासनाच्या कृषी योजनेचे कौतुक केले.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार म्हणाले, शेतकरी महाराष्ट्राचे खरे ब्रांड एम्बेसिडर आहेत. त्यामुळे यापुढे दरवर्षी त्यांचा कौतुक सोहळा होईल. पुरोगामी महाराष्ट्राला शोभेल अशा पद्धतीने पुरस्कार रक्कम चौपट वाढवली आहे. पाऊस जास्त झाल्याने होणारे नुकसान भरपाईसाठी पंचनामे सुरू आहेत. कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना जाहीर करण्यात आलेले हेक्टरी ५ हजार रुपये अनुदान उद्याच हस्तांतरित करण्यात येईल. त्यामध्ये ६५ लाख शेतकऱ्यांना अडीच हजार कोटी रुपये शेतकऱ्यांना वितरित करण्यात येणार आहे. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी पीक विमा योजनेत अडचणी दूर करण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच कांदा निर्यात बंदी बाबत सुद्धा मदत केल्याचे सांगितले. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मागची बाकी शून्य आणि पुढचे बिल शून्य असणारी वीज बिले लवकरच प्राप्त होतील, असेही उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी आश्वासित केले.कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी गेल्या दोन वर्षात केलेल्या कामाचा आढावा घेतला. पुरस्कार विजेत्या शेतकऱ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग इतर शेतकऱ्यांना करून द्यावा त्यांनी समाजात कृषी मार्गदर्शक दुत म्हणून काम करावे असे आवाहन केले. राज्यातील शेतकऱ्यांच्या योगदानामुळे महाराष्ट्र शासनाला राष्ट्रीय स्तरावर सर्वोत्कृष्ट कृषी राज्य म्हणून गौरविण्यात आले असल्याचे सांगून त्याबद्दल शेतकऱ्यांचे आभार मानले. कार्यक्रमास आमदार विक्रम काळे, कृषी विभागाच्या सचिव जयश्री भोज, कृषी आयुक्त आयुक्त रवींद्र बिनवडे, फलोत्पादन संचालक कैलास मोटे, कृषी संचालक विनायकुमार आवटे व इतर मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन क्षिप्रा मानकर यांनी केले.

### देवी भक्तांचा दर्शनाचा मार्ग

कामामध्ये दोन क्रॉसिंगचे काम रखडले होते. देवी भक्तांना येण्यासाठी हा रस्ता खुला व्हावा यासाठी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष दिनकर कदम व नगर सेवक मुखीद लाला यांनी क्रॉसिंगच्या कामाबाबत माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्याकडे पाठपुरावा केल्यामुळे तात्काळ जयदत्त आण्णांनी संबंधीत गुत्तेदारांना बोलवून देवी भक्तांची अडचण होऊ नये म्हणून क्रासिंगचे काम तात्काळ चालू करा असे सांगितले. नवरात्र घटस्थापनेच्या पुर्वीच रस्ता सुरळीत करून देण्यात यावा असे सांगितले. संबंधीत गुत्तेदाराने लगेच कामाला सुरवात करून येत्या तीन दिवसांमध्ये रस्ता चालू करून देऊ असे आस्वस्त केले होते त्यानुसार रविवारी काम प्रत्यक्ष चालू झाले आहे त्यामुळे दर्शनाला येणार्या देवी भक्तांचा मार्ग नवरात्र काळात सुकर होणार आहे. त्यामुळे स्थानिक नागरिक, भाविक भक्तांनी समाधान व्यक्त केले.

### नंदू मुंदडा भलताच करामती

मिळाले असून संबंधितांवर ट्रोसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व पंचायत समितीचे माजी सभापती ज्ञानोबा कांबळे यांनी केली आहे. याप्रकरणी त्यांनी येथील शहर पोलिस ठाण्यात रितसर फिर्यादही दिली आहे. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. या संदर्भात पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत ज्ञानोबा कांबळे यांनी असे म्हटले आहे की, जोगाईवाडी, ता. अंबाजोगाई, जि. बीड येथे सरपंच मनिषा बालासाहेब दोडतले आहेत तर उपसरपंच सुनिल बाबूराव मस्के आहेत. त्या दोघांच्या पक्षांचे नेते अक्षय नंदकिशोर मुंदडा आणि नंदकिशोर शिवभगत मुंदडा हे दोघे आहेत. वरिल चौघांनी संगनमत करून छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांचा अनादर करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय जोगाईवाडी येथील शासकीय कार्यालयात विमल मुंदडा यांचा फोटो वरिल तिन्ही महापुरुषांच्या बरोबरीने लावलेला आहे. त्यासोबतच नंदकिशोर मुंदडा यांचा फोटो भिंतीवर लावलेला आहे. बीड जिल्ह्यात सोशल मीडियावर ही बाब प्रसिद्ध झाली आहे. वरील प्रकाराबाबत काही सामाजिक कार्यकर्त्यांनी त्या घटनेचा निषेध करुन कायदेशीर कार्यवाही करण्याची लेखी मागणी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे केली आहे. परंतू, अद्याप कायदेशीर कार्यवाही झाली नाही. वरिल चारही आरोपी गैर अनुसूचित जातीचे आहेत. मी अनुसूचित जाती पैकी चांभार जातीचा सदस्य आहे. माझ्या सहित सर्व अनुसूचित जाती आणि जमातीचा समूह छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अत्यंत आदर करतो. वरिल महापुरुषांच्या शेजारी विमल मुंदडा यांचा फोटो लावून मनिषा बालासाहेब दोडतले, सुनिल बाबूराव मस्के, अक्षय नंदकिशोर मुंदडा, नंदकिशोर शिवभगत मुंदडा यांनी अनादर केला आहे. तरी त्यांच्या विरुद्ध माझी लेखी कायदेशीर फिर्याद आहे. तरी त्यांच्या विरुद्ध ट्रोसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा नोंद करुन त्वरित कार्यवाही करण्यात यावी हि नम्र विनंती, असे फिर्यादीत म्हटले आहे. यावर ज्ञानोबा लक्ष्मणराव कांबळे यांची स्वाक्षरी आहे. या निवेदनाची प्रत पोलिस अधीक्षक, बीड आणि नागरीक हक्क संरक्षण दल, बीड यांना देण्यात आली आहे.

### बैलगाडा शर्यतीने इतिहास

फलटण, नाशिक, माळशिरस, सांगली आदीसह बीड जिल्ह्यातील शेतकरी बांधवानी सहभाग नोंदवला. सकाळी ०८.०० वाजल्यापासून सायंकाळी ०७.०० वाजेपर्यंत बैलगाडा प्रेक्षकांची तोबा गर्दी मैदानावर होती. तळपत्या उन्हात लोकांनी शर्यतीचा आनंद लुटला. शुभारंभासाठी महंत शिवाजी महाराज, नारायणगड संस्थान नारायणगड, महंत शांतीब्रह्म नवनाथ बाबा, गोरक्षनाथ टेकडी संस्थान, महंत स्वामी योगिराज महाराज रामगड संस्थान, माजी आमदार राजेंद्र जगताप, सर्जेराव तांदळे, नवनाथ शिराळे, अशोकराव हिंगे, कल्याण काका आखाडे, नारायणराव शिंदे, सोमनाथराव माने, दिलीपशेठ लोढा, रमेश चव्हाण, लक्ष्मण काटे, ओमप्रकाश गिरी, गणेश उगले, भाऊसाहेब डावकर आदि मान्यवर उपस्थित होते. ही शर्यत यशस्वी करण्यासाठी राजेंद्र मस्के मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. शर्यतीचे नियोजन समन्वय व सूत्र संचालन मारुती तिपाले यांनी केले.

## पान सहा वरून

### गरजू मुलींच्या शिक्षणाचा खर्च

विकासासोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावरही लक्ष देते. महाविद्यालय विविध कार्यशाळा, सेमिनार्स, आणि नेतृत्व विकास उपक्रम आयोजित करते. संवाद कौशल्य, निर्णयक्षमता, आणि नेतृत्वाची क्षमता विकसित करण्यावर येथे विशेष भर दिला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांना नर्सिंग क्षेत्रात एक प्रभावी व्यावसायिक होण्याची संधी मिळते. सूर्यदत्ता कॉलेज ऑफ नर्सिंगमधून पदवीधर झालेल्या विद्यार्थ्यांना विविध नामांकित रुग्णालयांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. याशिवाय, महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलद्वारे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवरही काम करण्याची संधी मिळते. सूर्यदत्ता एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया यांचे असे म्हणणे आहे कि, नर्सिंग क्षेत्रात करिअर करण्याचे स्वप्न असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सूर्यदत्ता कॉलेज ऑफ नर्सिंग हे एक उत्तम ठिकाण आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आणि रुग्णसेवाचा वसा घेण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याचे येथे स्वागत केले जाईल. आधुनिक काळात वैद्यकीय सेवेची व्याप्ती वेगाने बदल आहेत. त्यात नर्सिंग क्षेत्रही अपवाद नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्या प्रमाणे शिक्षण देण्याची सुविधा येथे केली आहे. महाराष्ट्रातील गरजू विद्यार्थिनीसाठी, ज्या मुली शिक्षण घेऊ शकल्या नाही अश्या सर्वे मुलींना शिक्षण मिळावे, शिक्षणाची संधी मिळावी अशा सर्व मुलींसाठी सूर्यदत्ता कॉलेज ने सुवर्ण संधी उपलब्ध करून दिली आहे. संबंधित सर्व पदाधिकाऱ्यांनी गरजू मुलींशी दखल घेऊन आपल्या संस्थेच्या लेटर हेड वर पत्रव्यहार खालील पत्त्यावर करावा.

### सोयाबीन काढणीतच

दोन दिवसांपासून पावसाने जोर धरल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. पावसाने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे. सततच्या पावसामुळे परिसरातील विहीर कुपनलिका तुडुंब भरले आहेत तर नदी नाले खळखळून वाहू लागले आहेत. त्यामुळे शेती शिवारात सगळीकडे पाणी आणि चिखल पाहायला मिळत आहे. काही शेतकऱ्यांच्या सोयाबीनच्या पिकात पाणी जमा झाले आहे. पावसामुळे पिके काढताना अडचणी येत असून, नुकसान होत आहे. तरी सरकारने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गातुन होत आहे.

### माजलगावमध्ये वाहू लागले

या वेळेचे नियोजन करून गावा गावात जाणे,मंदीरात दर्शन घेणे,घरोघरी भेटणे, दुकान,टपरी,हॉटेल,,बाजारात भाजी पाला विकणारे शेतकरी, खेळणी,भांडे व खाऊचे पाल,रस्त्याने ये -जा करणारी मानसे यांना आदरपूर्वक नमस्कार करणे,विधानसभा निवडणूक,खा.शरदचंद्र पवार,आ.जयंत पाटील,पक्षाची भुमिका व तुतारी वाजवणारा माणूस हे पक्षाचे निवडणूक चिन्ह सांगत आपल्या परिचय पत्राची छापील पॉम्पेट हातात देवून पुढे चालणे असा प्रवास चालू आहे. माजलगाव मतदार संघात महा विकास आघाडीची उमेदवारी कोणाला भेटेल हे लवकरच जाहीर होईल परंतू खा.शरदचंद्र पवार हे सोशल इंजिनिअरींग चा प्रयोग करतील व उमेदवारी आपल्यालाच मिळेल,आपणच लढू व जिंकू या आत्मविश्वासाने प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे माजलगाव मतदार संघ पिंजून काढत आहेत.उच्च शिक्षित,प्रशासकीय सेवेचा अनुभव,चारित्र्य संपन्न व सतत हास्य वदनी नवीन चेहऱ्यास जनतेचा उदंड प्रतिसाद मिळत आहे.

### ट्रकने दुचाकीस स्वारास

विभागाला वारंवार केलेली आहे. परंतु बांधकाम विभागाने मात्र नागरिकांच्या मागणीचे दखल न घेता कोणत्याही प्रकारचे खड्डे बुजविण्याचे काम केलेले नाही. त्यामुळे अपघातांची मालिका कायम सुरू आहे . आठवडा लोटला नाही तोच उड्डाण पुलावरील अपघातात हा दुसरा बळी आहे. काही दिवसापूर्वीच खड्ड्यामुळेच ट्रॅक्टरवरील एक जणांचा मृत्यू झाला होता. शहरात येणारी अवजड वाहने यामुळे उड्डाण पुलावर वाहतूक कोंडी होत होती. तसेच अपघातांचे प्रमाण वाढले होते. हे लक्षात घेऊन परळी बायपास रोड वाहतुकीसाठी सुरू करण्यात आला आहे. परंतु या बायपास रोड वरून न जाता जड वाहने शहरातून येत आहेत. यामुळे हे अपघात होताना दिसून येत आहेत. उडान पुलावरील वाहतूक कोंडी नियंत्रित करण्यासाठी आणि अपघात टाळण्यासाठी कायमस्वरूपी ट्राफिक पोलिसांची परळीकर यांची मागणी आहे. परंतु उड्डाणपूलावर पोलिसांची तैनाती दिसून येत नाही. यामुळे अशा प्रकारच्या घटना घडताना दिसून येत आहेत .याकडेही पोलीस प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. दरम्यान खड्ड्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे बळी जात असताना यासाठी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरून त्यांच्यावरही गुन्हे दाखल करण्याची मागणी जनतेतून होत आहे. या अपघातातील मयत हा परप्रांतीय उत्तर प्रदेश असल्याचे समजते.

### प्राथमिक आरोग्य केंद्र

आजपर्यंत जवळपास ३ हजाराच्या वर रुग्णांनी त्या ठिकाणी उपचार घेतले असून सर्व रुग्णांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. भविष्यकाळात प्राथमिक आरोग्य केंद्रात अधिक भर पडावी आणि त्या ठिकाणी सर्व उपचार व्हावेत असेच नागरिकांची अपेक्षा आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र कुसळंब येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.अरबाज पठाण यांच्यासह सर्व आरोग्य कर्मचारी वर्गाचे देखील नागरिकांकडून उत्कृष्ट सेवेबद्दल आभार व्यक्त केले जात आहेत.

### महाराष्ट्र हितासाठी हात

संवाद साधत शिवसेनेचे पुढील ध्येय-धोरण याबाबत मार्गदर्शन केले. दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांनी देखील उपस्थित शिवदूत बूथ प्रमुख यांच्याशी संवाद साधत यंदाच्या विधानसभा निवडणुकीत आपल्या तळागाळातील माणसांची जाण असणारे मुख्यमंत्री शिंदे साहेबांच्या माघे आपल्याला ताकदीने उभा राहायचे आहे. शिंदे साहेबांना पुन्हा मुख्यमंत्री बनवण्यासाठी वज्रमुठ आवळून शिवसेनेला सत्तेत आणायचे आहे असे आवाहन केले. याप्रसंगी शिव सेना संपर्क प्रमुख, मराठवाडा विधानसभा समन्वयक शुभांगीताई नांदगावकर, सह संपर्काप्रमुख अंजलीताई मांडवकर, माझे सहकारी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, कृषी उत्पन्न समितीचे उप सभापती, महिला आघाडीच्या सर्व सदस्या उपस्थित होत्या तसेच बीड मतदार संघातून सर्व शिवदूत/बूथ प्रमुख, शिवसेना, युवासेना पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रास्ताविक प्रतिक कांबळे यांनी केले.

### होम मिनिस्टर कार्यक्रमाची

सिनेअभिनेता क्रांती नाना मळेगावकर आणि टीव्ही स्टार सह्याद्री मळेगावकर यांची असणार उपस्थिती या कार्यक्रमासाठी असणार आहे .कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी महिला भगिनींनी आपले नाव, पत्ता, वय लिहून ८९७२१४७२७२ या क्रमांकावर व्हाट्सअप मेसेज पाठवून नाव नोंदणी करायची आहे असे पंचायत समितीच्या मा.सभापती मनीषा कोकाटे यांनी म्हटले आहे.

### गरजूंना आरोग्य सेवा

मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक बाबासाहेब सानप यांनी केले. सुत्रसंचलन ताजुद्दीन शेख यांनी केले. आभार प्रा.पांडुरंग सुतार यांनी मानले. या शिबिरात पंचक्रोशीतील रूग्ण व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बीडमध्ये सत्कार सोहळ्याचे

आत्याचाराला वाचा फोडून त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले.समाज कल्याण मंत्री असताना अनेक योजना लाभ देऊन मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले. रामदास आठवले या संघर्षशील नेतृत्वाचा रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी बीड शहरात भव्य सत्कार सोहळा व भव्य रॅली काढण्यात येणार आहे. भव्य सत्कार सोहळ्यात व भव्य रॅलीमध्ये चर्मकार समाज बांधव, महिला व युवकांनी हजारोच्या संख्येने सामील होऊन चर्मकार समाज बांधवांनी शक्ती प्रदर्शन करावे.असे आवाहन ज्ञानोबा माने, अरुण कांबळे, योगेश गायकवाड, विलास बामणे, सुभाष पिंटू सेठ गायकवाड, पुरुषोत्तम भोसले, किशोर गायकवाड, रवींद्र माने, बाप्पा माने, अंगद कांबळे, शिवाजी कांबळे,अशोक इंगळे, मुंजा पानझडे, पिंटू मुंडे, किरण राजगिरे, अशोक भाळशंकर, मनोज कांबळे, अनिल सातपुते, सुनील गायकवाड, हरिदास तावरे, परमेश्वर जाधव, संजय भागवत, महादेव डोईफोडे आदींनी केले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अँन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# मला आमदार झाल्यासारखं वाटतय!

**पडघम** इच्छुक गुडघ्याला बाशिंग बांधून हिंडू लागले

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणूक तोंडावर आहे. तिकीट मिळो अथवा न मिळो इच्छुकांचे मात्र सध्या 'अच्छे दिन' आले आहेत. पक्ष श्रेष्ठींनी अनेकांना काम करा, पाहू या असा मेसेज दिल्याने इच्छुक गुडघ्याला बाशिंग बांधून स्वतःचे अस्तित्व पणाला लावून आहेत. केज विधानसभा मतदारसंघात कोणी साड्या वाटून तर कोणी कार्यक्रमाला हजेरी लावून तर कोणी मेडिकल कॅम्प ठेवून तरी पण कर्जमाफी, पिक विमा, पीक नुकसान भरपाई यांच्याकडे लक्ष न देता अनेकांना आमदार व्हायचंय. तुम्ही म्हणाल नेमके इच्छुक कोण ? गुडघ्याला बाशिंग बांधलेले कोण ? कर्तव्यदक्ष कोण ? अपेक्षा ठेवून असणारे किती? असा शोध घेतल्यानंतर आता अधिकाधिक स्वयंघोषीत नेते, इतर पक्षात हुजरेगीरी करणारे कार्यकर्ते यांना बहुधा आमदार व्हायचं असल्याचं दिसून येते आहे. अनेक इच्छूक आमदारकीच्या तीकीटासाठी पक्षश्रेष्ठीकडे पायघड्या घालतांना दिसून येत आहे. सोबत चार कार्यकर्ते घेऊन चहापाणी 'माझ्यामागे खूप' आहे, असा आव आणण्याचा काहींचा प्रयत्न सुरु असलेला येत



दीसुन आहे. आता मुद्दा हा आहे की, तिकीट किती जणांना देणार ? तिकीट मागणाऱ्यांची ही जत्रा काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना सह भाजप, वंचित पक्षातही आहे. आपणही तिकीट मागितले तर हरकत काय ? असे म्हणून आपल्या नावाचा श्रेष्ठींच्या दरबारात गाजावाजा सुरू केला आहे. निवडून येण्याची तशी प्रत्येकालाच शंभर टक्के शाश्वती असते. हाच विश्वास मनात धरून नेते मंडळी गुडघ्याला बाशिंग बांधून आहेत. त्यातही काहींनी पक्षाकडे उमेदवारीसाठी दावा केला आहे. इच्छुकांची संख्या अमाप आहे. आचारसंहिता लागायची आहे. इच्छुकांच्या मनात धाकधूक आहे. पण, नेत्यांशी असलेली जवळीक पाहता अनेकांना सध्यातरी आमदार झाल्यासारखं वाटतंय. तसे 'प्लानिंग' इच्छुक करताना दिसुन येत आहेत. रोजंदारीने, चहापाण्याचा खर्च करुन जमवलेल्या कार्यकर्त्यांच्या फौजफाट्यासह भेटीगाठी सुरु करून काही नेते कार्यकर्त्यांना खर्चपाणी करुन त्यांना सोबत घेवुन गावागावात भेटीगाठी घेणे सुरु केले. विविध बैठका तसेच पक्षश्रेष्ठीकडे चकराही मारतांना दिसून येत आहेत. काही नेत्यांना आता पाच- दहा टवाळखोर एकत्र जमवून राजकीय आखाड्यात आपला मनसुबा सिद्ध करण्याचे वेध लागलेले आहे, मात्र राजकारणातील समिकरणे आणि कार्यकर्त्यांचा फौजफाटा नसतांनाही केवळ स्टंट करण्यासाठीच हा मनसुबा असल्याचा दावा आता कार्यकत्यांकडून बोलला जात आहे. अनेकांनी विधानसभा निवडणुकीत आपले नशीब अजमविण्याचा चंग बांधलेला दिसून येत आहे. मात्र, त्यांच्याकडेही कार्यकर्त्यांची उणीव असतांना आमदार होण्याची स्वप्ने आता विधानसभा निवडणुकीच्या राजकीय मैदानात अनेकांना पडू लागल्यामुळे राजकारणाचाच हा पोरखेळ झाला की काय? असा सवालही कार्यकर्त्यांकडून आणि जनतेतून उपस्थित केला जात आहे.

## एक झाडं आईच्या नावाने अभियान!

**उपक्रम:** राहुरीत राबविले स्वछता अभियान




राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सरकारच्या वतीने दि.१७ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत सुरू असलेल्या स्वभाव स्वच्छता व संस्कार स्वच्छता या अभियाना अंतर्गत एक पेड मां के नाम या योजनेच्या निमित्ताने गाडगे महाराज आश्रमशाळा,शैक्षणिक संकुल आणि राहुरी नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण, स्वच्छता प्रतिज्ञा, प्रभात फेरी आणि मानवी साखळी चे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी नगर पालिकेचे मुख्याधिकारी श्री.ज्ञानेश्वर ठोंबरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.पाहुण्यांचे स्वागत श्री.गाडगे महाराज मिशन,मुंबई संस्थेच्या वतीने मुख्याधिकारी श्री.ज्ञानेश्वर ठोंबरे अग्निशामक दलाचे प्रमुख श्री.राजेंद्र पवार,उद्यान विभागाचे प्रमुख श्री.शंकर आगलावे,शहर समन्वयक श्री.पराग कुलकर्णी यांचे स्वागत-सत्कार शाखेचे संचालक सौ.भारती खिलारी,मुख्याध्यापक मिलिंद गुजरे, प्रा.मुख्याध्यापक सुरेश थेटे साहेब यांनी केले. यावेळी गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर ठोंबरे आपले मनोगत व्यक्त केले आणि शाळेला भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या,यावेळी शाखेचे सर्व शिक्षक,अधीक्षक,कर्मचारी वृंद आणि सर्व विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते.

## विश्व हॉस्पिटलमध्ये मनका विकार शिबिर

**डॉ विशाल पिंगळकर:** शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध न्यूरो सर्जन डॉ विशाल पिंगळकर यांच्या विश्व हॉस्पिटल बीड येथे जिल्ह्यातील सर्व रुग्णांसाठी २९ सप्टेंबर ते ०५ ऑक्टोबर.. पर्यंत मनका विकारावर सल्ला आणि मार्गदर्शन उपचार अत्यंत कमी दरात होणार आहेत या स्पाइन वीक मध्ये डॉक्टरांचा सल्ला,एम आर आय होल स्पाईन स्क्रीनिंग,होणार आहे. रुग्ण इतर वेळी आल्याच्या खूप खर्च होतो पण रुग्णांच्या समाधानाकरिता विश्व स्पाईन हेल्थ सप्ताह दरम्यान रुग्णांकरिता अत्यंत माफक दरात सर्व रक्ताच्या तपासण्या, एमआरआय, फिजिओथेरपी मार्गदर्शन,आणि डॉक्टरांचा सल्ला



हे होणार आहे. मनका घसरणे, नसा चोकअप होणे, मणक्याची गादी घसरणे,मनक्यात गॅप असणे, पाठ दुखणे,मान दुखणे, हातापायांना मुंग्या येणे बधीरपणा असणे, पायाचे पाठीशी दुखणे, हातापायाची संवेदन शक्ती कमी होणे,मणक्याचे अपघात,मज्जा तंतू मधील गाठी, स्पायनल ट्युमर इत्यादी विकाराने त्रस्त असणाऱ्या रुग्णांनी या मनका विकार शिबिराचा घ्यावा शिबिरामध्ये बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ विशाल पिंगळकर हे मार्गदर्शन आणि उपचार करणार आहेत. ही सवलत मध्ये उपचार फक्त आठवडाभरासाठी राहणार असून.. जास्तीत जास्त रुग्णांनी या आठवडाभराच्या मनका विकार शिबिराचा लाभ घ्यावा संपर्क ०२४४२-२९५१५१ ८२०८९५२४४२ संपर्क करून नाव नोंदणी करून घ्यावी असे आवाहन विश्व न्यूरो स्पाईन सुपर सर्जिकल हॉस्पिटल आणि रिहॅबिटेशन सेंटरच्या वतीने डॉ विशाल पिंगळकर यांनी केले आहे.

## रमेश रोडे यांचे निधन

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

भिमवाडी येथील रमेश रोडे यांचे मध्यरात्री हृदयविकाराच्या झटक्याने दुखद निधन झाले. ते आदर्श शिक्षक नामदेव रोडे गुरुजी यांचे सुपुत्र होते.त्यांच्या पार्थिवावर आज भीमनगर येथील शांतीवन स्मशानभूमीत दुपारी ३ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

रमेश नामदेव रोडे हे मराठवाडा विद्यापीठाला विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मिळावे यासाठी झालेल्या नामांतर लढ्यात सहभागी होते. सध्या ते परळी वीज निर्मिती केंद्रात नोकरीस होते.त्यांना काल रात्री दोन वाजण्याच्या सुमारास हृदयविकाराचा झटका आला यात त्यांचा मृत्यू झाला.रमेश रोडे यांचा अंत्यविधी शांतीवन समशानभूमी



भीम नगर येथे होणार आहे.त्यांच्या पश्चात आई, वडील, बहिण ,भाऊ, दोन मुली एक मुलगा असा परिवार आहे. ते माजी नगरसेवक महेंद्र रोडे व आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते सुरेश रोडे, वैद्यनाथ महाविद्यालयाचे ओएस अशोक रोडे यांचे बंधू होते. मृत्यू समय यांचे वय ४५ वर्षे होते.त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## निंबायती येथे एक दिवसीय प्रशिक्षण

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

महिलांना सशक्तीकरण प्रशिक्षण शिबिराचे रविवारी दि.२९ सप्टेंबर मौजे निंबायती येथे संपन्न झाले छत्रपती शाहू महाराज क्रुषी संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था व ग्रामपंचायत निंबायती यांच्या संयुक्त विद्यमाने महिला सशक्तीकरण प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.प्रशिक्षनाचे उद्घाटन सरपंच सौ सुनिता राजु पाटील यांच्या हस्ते करण्यात आले प्रमुख पाहुणे कल्पना बी मोहिते संरक्षण अधिकारी

जिल्हा बाल संरक्षण कक्ष जिल्हा महिला व बाल विकास

छत्रपती संभाजी नगर तर प्रशिक्षणासाठी यशदा चे प्रशिक्षक चंद्रकांत सोनवणे, मनिषा भोईर तसेच सारथी संस्थेचे अध्यक्ष अशोक पाटील हुड, ग्रामविकास



अधिकारी सुनील राकडे राकडे, अभिषेक हुड,उपसरपंच अर्चना राठोड , आदींची उपस्थिती होती प्रशिक्षण शिबिरात शंभर महिलांनी प्रशिक्षण घेतले यावेळी राजू पाटील, गजनांन राठोड, विशाल गोसावी, सलमान तडवी,अनुप तडवी,अनिस तडवी, उज्वला राठोड ,नारायण राठोड, नर्मदा राठोड,पुनम राठोड, रोहिदास चव्हाण यांच्या सह गावातील महिला प्रशिक्षणार्थी उपस्थित होत्या, महिला सशक्तीकरण हि काळाची गरज आहे, महिलाना वैचारिक, आर्थिकसाक्षर व,सक्षम करण्यासाठी संस्था काम करत असून याचा एक भाग निंबायती गावात होत आहे.असे अशोक हूड यांनी सांगितले कल्पना मोहिते यांनी महिला व बालकल्याण संबंधित विविध योजनांची माहिती दिली आभार सुनील राकडे केले.

## आमदारकीचं सोनं करणे हेच माझे ध्येय-आ.आजबे

म्हसोबावाडी/पुण्यभूमी प्रतिनिधी

आज पर्यंत तालुक्यात विविध विकास कामासाठी निधी आणून ते काम केले आहेत जनतेच्या विकासासाठी मी अहोरात्र प्रयत्न करत असून मी आज पर्यंत कोणत्याही अधिकाऱ्याचा रुपया खाल्ला नाही त्यामुळे माझ्याकडे कुणाची बोट करायची ताकद नसल्याचे प्रतिपादन आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आमदार बाळासाहेब आजबे यांनी घाटा पिंपरी येथे व्यक्त केले ते घाटा पिंपरी येथे दहा लक्ष रुपयांच्या सभामंडपाची उद्घाटन प्रसंगी बोलत होते ते पुढे बोलताना म्हणाले की दीडशे गावात दहा लक्ष रुपयांचे सभामंडप टाकले आहेत राहिलेल्या गावात दहा लक्ष रुपयाच्या सभामंडप टाकण्यात येतील गावात त्यात कार्य झाले पाहिजे म्हणून मी हा निर्णय घेतला आहे ज्या लोकांची अडचणी आहेत त्या सोडवण्याचा प्रयत्न मी सतत करत आहे गावाची गरज काय आहे ते मी पाहतो देवळाली ते सीना नदीपर्यंत पाणी साचले पाहिजे त्याचा फायदा शेतकऱ्यांना झाला पाहिजे त्यासाठी नदी खोलीकरण व संरक्षण भिंत गरजेचे आहे दादेगाव सब स्टेशन मंजूर असून नऊ सबस्टेशन मंजूर केले आहेत त्यात एकूण ५६८ डीपी मंजूर केले मी जे मंजूर झाले मी खोटे आश्वासन देत नाही याच्या आधी बंधारे का झाले नाहीत असा अहवाल हे त्यांनी विरोधकाचे नाव न घेता उपस्थित केला राहिलेल्या दोन वर्षात दोन हजार कोटीचा निधी आणणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी हरिभक्त परायण बबन महाराज घुमरे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी नाकाडे देवळालीचे सरपंच शेकडे पोपट , सरपंच विठ्ठल नागरगोजे ,प्पपु गवळी बबनराव राझणे दिलीप तांदळे फसले मेजर हरिभाऊ दहातोंडे परशुराम मराठे सह गावातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिला खो-खो संघ इंडिया लीगसाठी रवाना!

**क्रीडा:** निवड संघाचे होतेय कौतूक

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

पश्चिम विभागीय अस्मिता खेलो इंडिया खो- खो स्पर्धेच्या महाराष्ट्र महिला संघाचा निरोप समारंभ सरस्वती स्पोर्ट्स क्लबच्या वतीने मुंबई येथे पार पडला. हा संघ वडोदरा गुजरात येथे स्पर्धेत सहभागी होण्यासाठी रवाना झाला आहे. निरोप समारभावेळी या संघाला शुभेच्छा देण्यासाठी मुंबई संघटनेचे अध्यक्ष ड. अरुण देशमुख, राज्य संघटनेचे सहसचिव बाळ तोरसकर, मुंबई संघटनेचे कार्याध्यक्ष सुधाकर राऊळ, खजिनदार डलेश देसाई, शिवछत्रपती पुरस्कार विजेते मंदार म्हात्रे व इतर खो-खो प्रेमी उपस्थित होते.

वडोदरा, गुजरात येथील अस्मिता खेलो इंडिया लीग स्पर्धेत महिला व मुलींचे संघ भाग घेणार आहेत. पुण्याची कोमल दारवटकर हिची महाराष्ट्र महिला खो- खो संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली आहे.अस्मिता खेलो इंडिया महिला गटाची स्पर्धा ३० सप्टेंबर ते ०१ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत वडोदरा, गुजरात येथे होणार



आहेत. महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी हा संघ जाहीर केला आहे. दोन्ही संघास महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ड. गोविंद शर्मा यांनी शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्राचा महिला संघ : कोमल दारवटकर (कर्णधार), हृतिका राठोड,प्रियंका इंगळे( सर्व पुणे), रेश्मा राठोड, किशोरी मोकाशी, दीक्षा सोनसुरकर ( सर्व ठाणे), संपदा मोरे, ऋतुजा खरे, अमृता माने ( सर्व धाराशिव), साक्षी डाफळे (रत्नागिरी), प्रतीक्षा बिराजदार (सांगली), श्वेता वाघ (पुणे), देविका अहिरे (मुं. उपनगर), सेजल यादव (मुंबई), शिवानी यड्रावकर (धाराशिव), प्रशिक्षक : पुष्कर बर्वे (पुणे). याप्रमाणे संघ रवाना झाला .

## निर्णायक बैठक झाली स्थगित!

**आ.लक्ष्मण पवार:** अजून विचार करण्यासाठी मागितला वेळ

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी



विधानसभा मतदारसंघातील सर्व मित्र परिवार समर्थक यांनी मी विधानसभा लढवावी म्हणून आग्रह केलेला आहे तरी मला विचार करण्यासाठी काही वेळ द्या असे मि सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी यांना सागितले होते त्या अनुषंगानेच दि.२ ऑक्टोबर रोजी बैठक घेण्याचे ठरले होते पण काही कारणास्तव २ ऑक्टोबरची बैठक स्थगित करण्यात येऊन नवीन तारीख लवकरच कळवण्यात येईल असे आ.लक्ष्मण पवार यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात ते म्हणाले की २ ऑक्टोबर रोजी होणारी बैठक सध्या स्थगित करण्यात आली आहे तरी पुढील तारीख लवकरच कळवण्यात येईल असे आ.लक्ष्मण पवार यांनी दिलेल्या प्रसिद्धि पत्रकात म्हटले आहे.

**अभिनंदनिय** माझी वसुंधरा उपक्रमात पटकाविला पुरस्कार

## जरंडी ग्रामपंचायत मराठवाड्यात अव्वल

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्ह्यातील तब्बल आठ महिला सदस्य असलेल्या जरंडी ग्रामपंचायतीने माझी वसुंधरा अभियानात उत्कृष्ट काम करून गावाचा चेहरा मोहरा बदलवून टाकत निसर्गाशी संबंधित उपक्रम गावात राबवित घनवृक्ष लागवड, हा प्रयोग यशस्वी करून मराठवाड्यात माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये मराठवाड्यात अव्वल स्थान पटकावून प्रथम क्र पारितोषिक पन्नास लक्ष रु मिळविले आहे त्यामुळे जिल्ह्यातील सोयगाव च्या जरंडी ग्रामपंचायतचा झेंडा आता मराठवाडा भर रोवल्या गेला आहे

पृथ्वी, वायू,जल,अग्नी आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वावर आधारित माझी वसुंधरा अभियान (दि०१) एप्रिल २०२३ ते ३१ मे २०२४ या कालावधीत जरंडी ग्रामपंचायत ने राबविले यामध्ये घन वृक्ष लागवड अंतर्गत पंचवीस हजार वृक्षांची गावात लागवड करून विक्रम प्रस्थापित




केला तसेच वृक्ष लागवडीसाठी इतर गावांना चालना देण्यासाठी ग्रामपंचायतीने रोपवाटिका उभारून इतर ग्रामपंचायतींना वृक्ष पुरवठा केला तसेच संपूर्ण गाव भयमुक्त व भीतीमुक्त करण्यासाठी गावात विविध ठिकाणी सी सी टी व्ही बसवून व्यायाम शाळा हुतात्मा स्मारक गार्डन,पक्षांची किलबिलाट ची शाळा,संगीत कारंजे, विद्यार्थ्यांना अभ्यासिका, गावात चित्र रेखाटन आदी भरीव उपक्रम राबवून गावाचा चेहरा मोहरा बदलवुन गावच बदलवून टाकले त्यामुळे या ग्रामपंचायतला मराठवाड्यातून प्रथम क्रमांक मिळाला आहे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सरपंच स्वाती पाटील,वंदनाताई पाटील या दोन्ही रणरागिणीचा सत्कार करण्यात येऊन पन्नास हजार रु पारितोषिक जाहीर झाले आहे माझी वसुंधरा अभियानात ग्रामपंचायत ने केलेल्या कामांचे डेस्कटॉप मूल्यमापन त्रयस्थ यंत्रणामार्फत करण्यात आले या दोन्ही मूल्यमापन मधील एकूण गुणांच्या आधारे विभाग स्तरावर जरंडी ग्रामपंचायतीची प्रथम पारितोषिक साठी निवड करण्यात आली आहे सरपंच स्वाती पाटील,वंदनाताई पाटील, उपसरपंच संजय पाटील,नीलिमा पवार, द्वारकबाई राठोड,कल्पना मुठ्ठे,सलीमाबी तडवी,लिलाबाई निकम, चंद्रकला बाई चौधरी, मधुकर पाटील,मधुकर सोनवणे,ग्रामसेवक सुनिल मंगरुळे संतोष पाटील,सतीश बाविस्कर,अंबु राठोड आदींनी जल्लोष केला.

## सेवानिवृत्तबद्दल सत्कार उत्साहात!



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

औष्णिक विद्युत केंद्रात संच क्रमांक ८ येथे सुरक्षितता विभागातील सहाय्यक अभियंता युवराज शंकरराव शिंदे किल्लारीकर यांच्या सेवानिवृत्ती निमित्त तिरुपती मंगल कार्यालय येथे दि २९ सप्टेंबर २०२४ रोजी शुभेच्छा देताना परळी औष्णिक विद्युत केंद्राचे उपमुख्य अभियंता महेश महाजन सोबत अधीक्षक अभियंता धनंजय कोकाटे, संजय उद्धार,कंत्राटदार भगवान साकसमुद्रे तसेच त्यांचे सुपुत्र सुरज शिंदे आदी उपस्थित होते.

# नका करू शिक्षणाचा खेळखंडोबा!

## वर्तमान

बबन दामोदर गुळवे
9545442648

ग्रामीण भागातील बहुतांश विद्यार्थी हे गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षण घेत असतात. गावोगावी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व काही मोठ्या गावांत जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळा आहेत. खेड्यांत गोरगरिबांच्या व मध्यमवर्गीयांच्या मुला-मुलींना शिक्षणासाठी याच शाळांचा खरा आधार असतो. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळते हे अगदी खरे आहे. परंतु, चालू शैक्षणिक वर्षामध्ये अशैक्षणिक उपक्रमांचा नुसता भडिमार सुरू असल्याने शिक्षणाचा खेळखंडोबा करून गोरगरिबांच्या मुला-मुलींचा शिकण्याचा अधिकार हिरावून घेतला जात आहे की काय, अशी शंका निर्माण झाली आहे.

होय, हे खरे आहे की यावर्षी अगदी जूनपासून एकानंतर एक अशा अशैक्षणिक कामांमध्ये शिक्षकांना गुंतवले गेले आहे. विविध निबंध स्पर्धा, शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण, असाक्षर लोकांची शोधमोहीम, मुख्यमंत्री माझी शाळा, महावाचन उपक्रम, शिक्षण पंधरवडा, स्वच्छता पंधरवडा, भाषा संवर्धन पंधरवडा, असे कितीतरी उपक्रम राबवणे सुरू आहे. या सगळ्या उपक्रमांची माहिती ऑनलाईन भरण्यासाठी वरिष्ठांकडून सुचनांचा तगादा लावला जात आहे. तसेच, विद्यार्थी पोर्टलवर व युडायस प्लसवर विद्यार्थ्यांची, शिक्षकांची, शाळांची अचूक माहिती आजच्या आज भरा, असा आदेश दिला जातो. संच मान्यतेची, शाळेच्या भौतिक सुविधांची अचूक माहिती तात्काळ भरा, असा आदेश दिला जात आहे. मग काय शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवायचे सोडून आलेल्या लिंकवर किंवा शैक्षणिक ॲपवर माहिती भरत बसतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असते, याकडे कोणीही गांभीर्याने लक्ष द्यायला तयार नाही. उपक्रम नेमके कशासाठी घेतले जातात? या उपक्रमांचा विद्यार्थ्यांना व शिक्षकांना नेमका किती फायदा होतो, हे तपासून बघायला प्रशासकीय यंत्रणा कार्यान्वित नाही. शिक्षण क्षेत्रात अनेक पदांवर केवळ प्रभारी अधिकारी काम करत आहेत. केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी, राजपत्रित मुख्याध्यापक, गटशिक्षणाधिकारी ही सगळी महत्त्वाची पदे केवळ प्रभारी राहिली आहेत. मागील दहा ते पंधरा वर्षांपासून ही पदे रिक्त आहेत. त्यामुळे महाराष्ट्राचे शिक्षणक्षेत्र हे सलाईनवर तगले आहे. काही जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची तीन ते चार पदे रिक्त आहेत, तर काही शाळांमध्ये शिक्षकांची पदे अतिरिक्त झाले आहेत. याला कारणीभूत संचमान्यतेचे जाचक नियम आहेत. हळूहळू लोकसंख्या नियंत्रणात येत आहे. हम दो हमारे दो या नीतीमुळे जन्मदर घटला आहे व बालकांची संख्या नियंत्रित झाली आहे. आणि इंग्रजी शाळांचे पीक जोमात असल्याने जिल्हा परिषदेच्या शाळेतील पट दिवसेंदिवस घटत चालला आहे. अशा परिस्थितीत संच मान्यतेचे निकष न बदलता आणि शिक्षकांच्या पद मान्यतेसाठी पटाची अट कमी न करता शाळांची संचमान्यता केली जात आहे. याचा विचार शासनाने गांभीर्याने करणे गरजेचे आहे. वीस पटापेक्षा कमी विद्यार्थीसंख्या असलेल्या शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षकांना नियुक्ती देण्याचा घाट घातला गेला आहे. अशाने शिक्षण विभागात सावळा गोंधळ चालू असल्याचे दिसून येत आहे. नवीन व जाचक शैक्षणिक धोरणे, संचमान्यतेचे जाचक निकष आणि जिल्हा परिषद शाळांमध्ये अशैक्षणिक उपक्रमांचा भडिमार, यामुळे महाराष्ट्रात शिक्षणाचा खेळखंडोबा झाला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे अतोनात शैक्षणिक नुकसान होत आहे.

हे लक्षात आल्याने शिक्षक संघटनांनी 'आम्हाला शिकवू द्या व विद्यार्थ्यांना शिकू द्या' हे घोषवाक्य पुढे करून अनेकवेळा आंदोलन केले आहे. एकीकडे शिक्षकांना अशैक्षणिक कामांमध्ये गुंतवून ठेवायचे आणि दुसरीकडे शाळांची गुणवत्ता तपासायची हा तुघलकी कारभार सध्या सुरू आहे. त्यामुळे शिक्षक वैतागून गेले आहेत. आपल्या व्यथा शिक्षण विभाग जाणून घ्यायला तयार नाही याचे शिक्षकांना व शिक्षक संघटनाना वाईट वाटते आहे. चालू शैक्षणिक वर्षाचे प्रथमसत्र संपत आले तरीही अशैक्षणिक उपक्रम संपलेले नाहीत. आता पुढील महिन्यात प्रथम सत्र संकलित मूल्यमापन चाचणी होणार आहे. अशैक्षणिक उपक्रमांच्या तगाद्यात अध्यापन किती प्रभावी झाले असेल? आणि विद्यार्थी परीक्षेला सामोरे कसे जातील? या प्रश्नांची उत्तरे समाधानकारक मिळणार नाहीत. यास्तव शिक्षणाचा खेळखंडोबा झाला आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांना या सगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. परिणामी जिल्हा परिषदेच्या शाळांचा पट कमी होत आहे. म्हणून यावेळी मुद्दाम सांगावे वाटते की सहशालेय व सामाजिक उपक्रम केवळ जिल्हा परिषदेच्या शाळांपुरता मर्यादित न ठेवता ते सगळे उपक्रम सर्व शाळांमध्ये राबवले जावेत. खासगी शाळांना मोकळे सोडून सगळी बंधने जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी असू नयेत.

उमरगा कोर्ट, ता. अहमदपूर, जि. लातूर
मो. नं.: ९५४५४४२६४८

## अन्वयार्थ

# 'रेवडी संस्कृती': कोणाच्या पिताश्रींचे काय जाते?



न.मा. जोशी
8805948951

**तुम करो तो ठीक, हम करे तो पाप**
**तुम जियो तो पुण्य, हम जियें तो पाप**
**तुम कहो तो सच, हम कहें तो झूठ**
**तुमको सब मुआफ़, जुल्म हो के लूट**
**आज चाहे तुम नोच लो जुबां**
**आने वाला दौर लेगा सब हिसाब!**

जितेंद्र, आशा पारेख, बलराज साहनी यांच्या प्रमुख भूमिका असलेला १९७० मध्ये प्रदर्शित 'नया रास्ता' या चित्रपटात बलराज सहानी यांच्यावर चित्रित अत्यंत मार्मिक गाणे आहे. पन्नास वर्षानंतरही आजच्या राजकीय वातावरणात तर हे गाणे फिट बसते. केंद्रातील भाजप सरकार जे जे करते ते ते पुण्य मात्र इतरांनी केले तर ते पाप, ते जे बोलतील ते सत्य, इतरांनी बोलले तर ते मात्र झूठ असे चित्र आहे.

आता हेच बघा. 'आपल्या देशात 'रेवडी' वाटून मते मागण्याची संस्कृती रुजत असून ती देशाच्या विकासासाठी अत्यंत घातक आहे, नागरिकांनी रेवडी संस्कृतीपासून सावध राहावे आणि राजकारणातून 'रेवडी संस्कृती'ची हकालपट्टी करावी, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले होते. उत्तर प्रदेशातल्या जालौन जिल्ह्यातील ओराई येथे आयोजित एका जाहीर सभेत मोदींनी हे वक्तव्य केले होते.

मोदी यांनी जे म्हटले होते ते खरोखरंच स्वागतयोग्य आहे. मात्र, दुर्दैवाने स्वतः मोदी किंवा त्यांचा भाजपा 'रेवडी संस्कृती'चाच उदोउदो करत आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेचा बट्ट्याबोळ झाला तरी चालेल, पण भाजपाबरोबर आता सारेच राजकीय पक्ष 'रेवडी संस्कृती' पासून स्वतःला दूर करू शकत नाहीत.

नागरिकांच्या घामाच्या कमाईतून, त्यांनी दिलेल्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष करातून सरकारची भरलेली तिजोरी 'रेवडी संस्कृती'च्या वापराने रिक्त केल्या जात आहे, रेवडीच्या भरोशावर सत्ता उपभोगणारे मौजमजा मारत आहेत. अनेक राजकीय नेते आणि सत्ताधीश यांची लाखो करोडो अब्जोची मालमत्ता आहे, तिला धक्का न लावता सरकारी तिजोरीची लयलूट करताना त्यांना संकोच वाटत नाही. आता हरियाणा आणि जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुका आहेत. नोव्हेंबरमध्ये झारखंड आणि महाराष्ट्रात होणार आहेत. या चारही राज्यात सगळ्याच राजकीय पक्षांनी आपली व्होट बँक मजबूत करण्यासाठी 'रेवडी संस्कृती'ची उधळण सुरू केली आहे. रोजगार निर्मिती करून लोकांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व सक्षम बनवण्याऐवजी पाच किलो धान्य फुकट वाटप करून त्यांना निष्क्रिय बनवण्यावर केंद्र सरकारने लक्ष केंद्रीत केले आहे आणि सरकार कोणाचेही असो त्याचीच री बाकी राज्यात सुरू आहे. हा फुकटचा आर्थिक फटका हजारो कोटी रुपयांचा आहे, ज्याचा परिणाम आधीच मोठ्या आर्थिक भाराचा सामना करणाऱ्या तिजोरीवर होत आहे.

आता हेच पहा, हरियाणा भाजपने सादर केलेल्या आकर्षक आश्वासनांमध्ये एक लाख शेतकऱ्यांची १३३ कोटी रुपयांची कर्जमाफी, खरीप पिकासाठी प्रति एकर २,००० रुपयांची घोषणा, एलपीजी सिलिंडरच्या किमतीत ५०० रुपयांनी कपात, आर्थिकदृष्ट्या दुर्बलांसाठी मोफत बससेवा, बेरोजगार तरुणांना १२०० ते ३५०० रुपयांपर्यंतचा बेरोजगार भत्ता, अंगणवाडी सेविकांना ११०० रुपये, अटल कॅन्टीनमध्ये १० रुपयांत जेवण उपलब्ध करून देणे आदींचा समावेश आहे. नरेंद्र मोदी कान-नाक-डोळे बंद करून आहेत.

काँग्रेसने १ लाख कायमस्वरूपी रोजगार, वृद्धांना ६,००० रुपये पेन्शन, ३००युनिट मोफत वीज, ५०० रुपयांमध्ये गॅस सिलिंडर, सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना वन रँक वन पेन्शन देण्याचे आश्वासन दिले असताना, आपने ५ गॅरंटी सादर केल्या आहेत, ज्यात १००० रुपयांचा समावेश आहे. प्रत्येक स्त्रीसाठी, प्रत्येक बेरोजगाराला रोजगार, मोफत वीज, वैद्यकीय उपचार आणि शिक्षण, असे आश्वासन दिले. शेजारच्या पंजाबमध्ये अडीच वर्षे सत्तेत असलेल्या 'आप'ने दिले आहे.

जम्मू आणि काश्मीरमध्ये भाजपने केले प्रत्येक कुटुंबातील ज्येष्ठ महिलांना दरमहा १८०० रुपये, प्रति वर्ष २ मोफत एलपीजी सिलिंडर प्रदान केले आहे. ५ लाख रोजगाराच्या संधी निर्माण, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वर्षाला ३,००० रुपये प्रवास भत्ता, दोन वर्षांसाठी १०,०००रुपये कोचिंग फी, दुर्गम भागातील उच्च माध्यमिक वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना लॅपटॉप देण्याचे आश्वासन दिले आहे.

काँग्रेसने प्रत्येक कुटुंबाच्या महिला प्रमुखाला दरमहा ३००० रुपये, महिला उद्योजकांना ५लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज, प्रत्येक कुटुंबाला २५ लाख रुपयांचा आरोग्य विमा, प्रति व्यक्ती ११किलो धान्य, एक लाख रिक्त पदे भरण्याचे आश्वासन दिले आहे. नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपीने देखील अशीच आश्वासने दिली आहेत. कर देणाऱ्या नागरिकांच्या घामाचा पैसा कोणत्याही पक्षाची व्होट बँक मजबूत करण्यासाठी खर्च होणार का, हा खरा प्रश्न आहे. आश्वासने पूर्ण करण्यासाठी नेते आणि पक्ष स्वतःच्या खिशातून एक दमडीही खर्च करीत नाहीत. ज्येष्ठ पत्रकार पूनम कौशिक यांनी लिहिले आहे की सत्तेच्या भुकेल्या नेत्यांचे राहणीमान तर सरंजामशाही महाराजांसारखे आहे. कर्जमाफी, स्वस्त तांदूळ, मोफत विजेची हमी या गोष्टी अत्यंत गरिबी, आर्थिक संकट आणि बेरोजगारीच्या आधारे न्याय्य ठरू शकतात, पण आपण विकास आणि समृद्धीसाठी, चांगल्या शैक्षणिक संस्था, आरोग्य सुविधा, रुग्णालये, पायाभूत सुविधा इत्यादींसाठी कर भरतो, निवडणुका जिंकण्यासाठी नाही.

मध्य प्रदेशातील लाडली बहन योजना भाजपसाठी गेम चेंजर ठरली असेल, पण त्यामुळे सरकारचा आर्थिक बोजा वाढला आहे. पुन्हा सत्तेत येण्याची खात्री नसल्याने मध्य प्रदेशातील कित्ता महाराष्ट्रातील एकनाथ शिंदे महायुती सरकार गिरवत आहे. नागरिकांना सक्षम बनवण्यासाठी त्यांना शिक्षण देणे, रोजगार उपलब्ध करून देणे, व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून देणे हे सरकारचे काम आहे. जे शारीरिकदृष्ट्या सक्षम नाहीत, केवळ अशाच नागरिकांना निर्वाह भत्ता वगैरे देणे अपेक्षित आहे. त्यामुळे निराधार पेन्शन योजना, अंगणवाडीतून तसेच शाळांमधून दिला जाणारा पोषण आहार, सर्वांना मोफत शिक्षण आणि आरोग्य अशा योजना कल्याणकारी राज्यात रास्त आहेत, पण वीज फुकट, धान्य फुकट, कुठल्याही कामाचा मोबदला म्हणून नव्हे तर सरळ खात्यात पैसे जमासारख्या योजना म्हणजे लोकशाहीची थट्टाच आहे.

सुदृढ आणि रोजगारक्षम वयातील महिलांना घरबसल्या १५००रुपये देण्यापेक्षा त्यांना रोजगार उपलब्ध करून दिल्यास त्यांची आर्थिक, सामाजिक स्थिती सुधारेल. कोविडकाळात लोकांना फुकट धान्य देणे ही तेव्हाची गरज होती, पण आजही ती योजना राजकीय स्वार्थासाठी सुरूच आहे. हे राज्याच्या तिजोरीवर म्हणजेच शेवटी लोकांवर भार वाढवणे होय. याशिवाय मोफत वीज, मोफत गॅस सिलिंडर, मोफत किंवा सवलतीच्या दराने प्रवास यांसारख्या अनेक योजना राबविल्याने लाभार्थ्यांचे भले तर होणार नाहीच, पण राज्याच्या आधीच खडखडाट असलेल्या तिजोरीवर प्रचंड भार पडणार आहे याचा सरकारला विसर पडला आहे.

पंजाबचे 'आप' सरकार शेतकरी आणि लोकांना मोफत वीज देण्यासाठी १७११० कोटी रुपयांचा बोजा सहन करत आहे. कर्नाटकातील काँग्रेस सरकारला पाच गॅरंटी पूर्ण करण्यासाठी ६०,००० कोटी रुपयांची गरज आहे. तेलंगणातील काँग्रेस सरकारलाही शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यासाठी २१००कोटी रुपयांची गरज आहे. फुकटच्या रेवडी संस्कृतीचा परिणाम म्हणजे आर्थिक परिस्थिती बिघडत आहे आणि महागाई वाढत आहे. सामान्य माणूस मूर्ख नाही याचा विसर राज्यकर्त्यांनी होऊ देऊ नये. 'रेवडी संस्कृती'ची नौटंकी विकासालाही घातक आहे. सरकारी तिजोरी म्हणजे आपल्याच परमपूज्य पिताश्रींचीच खासगी मालमत्ता आहे आणि आपण तिचे वारस आहोत असे समजून तिचा गैरवापर करणाऱ्यांना जनतेनेच धडा शिकवण्याची गरज आहे असे म्हटल्यास ते चूक ठरू नये.

**सस्ते में लूट लेते है, ये सत्ता वाले अक्सर उन्हें,**
**जिन्हें खुद की कीमत का अंदाज़ा नहीं होता.**

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक असून राज्य मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य आणि ज्येष्ठ पत्रकार आहेत.)
यवतमाळ.

## राशी भविष्य

### दि. २९ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर २०२४

**दि. २९ सप्टेंबर**- संन्यासिजनांचा महालय, भाऊसाहेब महाराज अयाचित पुण्यतिथी- नागपूर, **दि. ३० सप्टेंबर**- माधवराव महाराज पुण्यतिथी- पाटणबोरी यवतमाळ, जागतिक हृदय दिन, **१ ऑक्टोबर**- अमावास्या प्रा. रात्री ९.३८ मि. ज्येष्ठ नागरिक दिन, **२ ऑक्टोबर** - भाद्रपद अमावास्या, सर्वपित्री दर्श अमावास्या, महात्मा गांधी जयंती, लाल बहादूर शास्त्री जयंती, अमावास्या समाप्ती २४.१८ मि., **३ ऑक्टोबर**- घटस्थापना, आश्विन मासारंभ, नवरात्रोत्सवारंभ हिवरा, दि. **४ ऑक्टोबर**- जागतिक प्राणी दिवस, **दि. ५ ऑक्टोबर**- मुस्लिम रविलागर मासारंभ.

**मेष - अचानक प्रवास योग.**
मित्र-मंडळीसोबत शुभकार्यानिमित्त किंवा भटकंतीसाठी प्रवासाला जाण्याचे योग येतील, मात्र प्रवासात सतर्क राहा, किंमती वस्तू सांभाळून ठेवा, तरुणांचा कामातील उत्साह वाढता राहील.

**वृषभ - विचारपूर्वक निर्णय घ्या.**
काही महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतील. अशावेळेस तडकाफडकी निर्णय न घेता, शांततेत विचार करून निर्णय घ्या, कुटुंबातील सदस्यांशी संवाद साधा, नातेवाईकांकडून शुभ संकेत मिळतील.

**मिथुन - अनुकूल वातावरण राहील.**
आपल्या कार्यक्षेत्रातील/कुटुंबातील वातावरण अनुकूल राहील. व्यवसायात उत्तम आर्थिक लाभ होतील, आपल्या भाषेवर प्रभुत्व राहील.

**कर्क - स्पर्धा टाळा.**
आपण व्यवसायातील कुठल्याही स्पर्धेत न उतरणे योग्य राहील, तेव्हा व्यवसायातील स्पर्धा टाळा; आपण करीत असलेल्या कामाच्या कार्यक्षेत्रात बदल होऊन आपल्याही कामाचे स्वरूप बदलेल.

**सिंह - अडचणीवर मात कराल.**
आपल्याला आपल्या कार्यक्षेत्रात नोकरीच्या ठिकाणी असो की शिक्षणात येणाऱ्या अडचणीवर आपण युक्तीने मात कराल. आपल्या अडचणी आपणच सोडवाल. ज्येष्ठांचे योग्य मार्गदर्शन मिळेल.

**कन्या - धावपळ/दगदग टाळा.**
आपण आपल्या आरोग्याची काळजी स्वतः घ्यावी. अनावश्यक धावपळ/दगदग करू नका. शक्य होईल तेवढीच कामे करा. मुलांना कुसंगतीपासून दूर ठेवा.

**तूळ - योजनांना गती द्या.**
आपण व्यवसायासंदर्भात आखलेल्या योजनांना गती द्या. त्या कृतीत उतरण्यासाठी प्रयत्नशील राहा. योजना कृतीत उतरविण्यासाठी नियोजन करून कामे करा. मन प्रसन्न राहील.

**वृश्चिक - करार होतील.**
खरेदी-विक्री संबंधित करार पूर्ण होतील, तसेच एजंट-जाहिरातदार यांनासुद्धा जाहिरातीचे करार करता येतील. कामानिमित्त प्रवास होईल. महत्त्वाच्या कामासाठी इतरांवर अवलंबून राहू नका.

**धनू - अपेक्षाभंग होईल.**
आपण सहकारी/मित्र/नातेवाईक यांच्याकडून तुम्ही केलेली सहकार्याची अपेक्षा पूर्ण होऊ शकणार नाही, त्यांच्याकडून अपेक्षा भंग होईल, तरी तुम्ही खचून जाऊ नका.

**मकर - वेळेचे बंधन पाळा.**
आपल्यावर असलेली जबाबदारीची कामे आपण वेळेतच पूर्ण करा, वेळेचे भान ठेवा, आळस झटका व कामाला लागा. सकारात्मक दृष्टीकोन, विचार करणे आपल्यासाठी फायद्यांचे राहील.

**कुंभ - सल्ला देऊ नका.**
आपण कुणालाही सल्ला देण्याच्या भानगडीत पडू नका किंवा कुणाच्या भांडणात मध्यस्थीदेखील करण्याचा प्रयत्नही करू नका.

**मीन - मनासारखी कामे होतील.**
तुम्ही मनात कल्पना केल्याप्रमाणे कामे होतील. तुमचा कामावरील आत्मविश्वास वाढेल. राजकीय व्यक्तीपासून थोडे दूरच राहा.

**।। इति शुभं भवतू ।।**

**अविनाश अंजनकर**, अकोला

# उद्या तुमचाही एन्काउंटर होऊ शकतो...!

आज बदलापूर प्रकरणातील आरोपीचा एन्काउंटर झाला म्हणून पेढे वाटत असताना, फटाके फोडत असताना, नाचत असताना, सिलेब्रेट करत असताना आपण न्यायव्यवस्थेचे बारा वाजवत आहोत आणि आपल्या पुढच्या पिढ्यातील पुरुषांची कबर खोदण्याची व्यवस्था करीत आहोत हे लक्षात ठेवावे. न्यायालयाबाहेर जर प्रकरणांचे असे परस्पर निकाल लावून शिक्षा दिली जाणार असेल तर आज सुपात असलेले तुम्ही उद्या जात्यात असाल हे विसरू नका. कायदा हातात घेऊ नका.

## वेध

उत्तम जोगदंड



तीस-पस्तीस वर्षांपूर्वी एका बलात्कार रॅकेटचा भांडाफोड एका आमदार महाशयांनी महाराष्ट्र विधिमंडळात केल्याची बातमी वाचल्याचे आठवते. त्या आमदारांचे नाव आठवत नाही. या रॅकेटची मोडस ऑपरेंडी अशी होती. उल्हासनगर, मुंबई परिसरातील धनाढ्य लोक त्यावेळी सुट्ट्या एंजॉय करायला शेजारच्या गुजरात राज्यात तसेच सिल्व्हासा येथे जात असत. ते परत आल्यावर काही दिवसांनी गुजरातचे पोलीस अशाच कोणीतरी एंजॉय करून आलेल्याच्या दारात अटक वारंट घेऊन येत. त्यात त्या व्यक्तीने गुजरातमध्ये एका आदिवासी महिलेवर बलात्कार केल्याचा आरोप केलेला असे.

पहिल्यांदा तो व्यक्ती तर हादरूनच जात असे, पण मग सावरून, त्या पोलिसावरच खोटे वॉरंट आणल्याबद्दल उखडत असे. मग पोलीस एफआयआर दाखवायचा. त्यात त्या व्यक्तीचा गाडी नंबर, त्याचे वर्णन, नाव वगैरे सगळे जुळायचे. मग आपण त्या भागात एंजॉय करायला त्याच सुमारास गेलो होतो ते त्याला आठवायचे आणि बलात्काराची तारीख जुळायची. मग त्या व्यक्तीची बायको येऊन हातापाया पडायची... वगैरे वगैरे. गांगरून केलेल्या त्या व्यक्तीला काहीही सुचत नसे. त्या व्यक्तीचा, कुटुंबाचा धीर पूर्णतः खचला की प्रकरण मांडवलीवर यायचे. शेवटी कथित बलात्काऱ्याच्या औकातीनुसार ५० हजार ते एक-दोन लाखात (त्या काळातील रुपये) प्रकरण मिटायचे.

आमदार महाशयांनी या रॅकेटचा भांडाफोड करताना तर कमालच केली होती. त्यांनी चक्क एका मंत्री महोदयांच्या नावेच वारंट आणून सभागृहात फडकवले होते. हे रॅकेट चालवणारी गॅंग, एंजॉय करायला गुजरातेत जाणाऱ्यांच्या मागावर असे. ते त्यांची गाडी घेऊन कुठे कुठे जातात याचे फोटोसहित पुरावे गोळा करत आणि त्या तारखेला, त्या ठिकाणच्या जवळपासच्या खेड्यातील एका आदिवासी महिलेवर बलात्कार केल्याची फिर्याद दाखल करत असत. सगळे काही मिलिभगत अनुसार होत होते. विधिमंडळात हे प्रकरण गाजल्यावर महाराष्ट्र आणि गुजरात सरकारने काही पावले उचलली आणि हे प्रकार बंद झाले.

हे आठवण्याचे कारण आहे बदलापूर बालिका लैंगिक अत्याचार प्रकरणात झालेले आरोपीचे एन्काउंटर आणि त्यानंतर लोकांनी पेढे वाटून, फटाके फोडून, नाचून एंजॉय करत एन्काउंटरला दिलेला प्रतिसाद. बलात्कार करणाऱ्याला कडक शिक्षा व्हावी याबद्दल दुमत नाहीच, पण आपल्या देशात शिक्षा देण्याचे काम न्यायालय करते. ते पोलिसांनी एन्काउंटर करून किंवा जनतेने मॉब लिंचिंगद्वारे करायचे नसते, कारण एक तर आपल्याकडे कायदा आहे, न्यायालये आहेत. आणि दुसरे म्हणजे, अशा एन्काउंटरचा प्रयोग राजकारण, धर्मकारण, पोलिसांचा किंवा कोणाचा तरी स्वार्थ इत्यादी कारणांमुळेदेखील होऊ शकतो. तसेच, दिसला बलात्काराचा आरोपी की करा त्याचा एन्काउंटर, टाक त्याला मारून, हा ट्रेंड त्यामुळे प्रचलित होऊ शकतो. एकदा का हा ट्रेंड प्रचलित झाला की वरील रॅकेटप्रमाणे खोटी केस टाकून एन्काउंटर करण्याचे रॅकेटसुद्धा अस्तित्वात येऊ शकते. एकदा का तुमच्यावर बलात्काराची केस दाखल झाली की तुम्ही बलात्कार केलेला असो वा नसो, तुम्ही वरील न्यायाने बलात्कारीच ठराल. मग कोर्ट वगैरे राहिले बाजूला, एक तर एन्काउंटर किंवा झुंडबळी व्हायची तयारी ठेवावी लागेल आणि त्यात अनेक निष्पाप पुरुषांचा नाहक बळी जाऊ शकतो. याच रॅकेटचा अजून एक पैलू म्हणून तुमच्या ध्यानीमनी नसताना, भर रस्त्यात कोणीतरी महिला तुमच्या जवळ येऊन, याने माझ्यावर बलात्कार केला म्हणून बोंबा ठोकू शकते आणि आसपास उभे असलेले रॅकेटमधील लोक तसेच आता मॉब लिंचिंगसाठी सरावलेला जमाव मिळून तुम्हाला एवढे ठोकून काढतील की तुम्ही जिवंतदेखील राहू शकणार नाही. इथे तर पोलिसात केसही दाखल झालेली नसेल.

मग हा बलात्काराचा आरोप असलेला आणि नाहक बळी जाणारा निष्पाप पुरुष एखाद्या पुरुषाचा किंवा महिलेचा मुलगा, बाप, भाऊ, कोणीही असू शकेल आणि हो, तुम्ही स्वतःही असू शकाल. तुमचा बळी गेल्यावरसुद्धा पेढे वाटले जातील, फटाके फोडले जातील, लोक नाचून सिलेब्रेट करतील, जसे बदलापूर आरोपीचे एन्काउंटर झाल्यावर लोकांनी केले. आज बदलापूर प्रकरणातील आरोपीचा एन्काउंटर झाला म्हणून पेढे वाटत असताना, फटाके फोडत असताना, नाचत असताना, सिलेब्रेट करत असताना आपण न्यायव्यवस्थेचे बारा वाजवत आहोत आणि आपल्या पुढच्या पिढ्यातील पुरुषांची कबर खोदण्याची व्यवस्था करीत आहोत हे लक्षात ठेवावे. न्यायालयाबाहेर जर प्रकरणांचे असे परस्पर निकाल लावून शिक्षा दिली जाणार असेल, तर आज सुपात असलेले तुम्ही उद्या जात्यात असाल हे विसरू नका. कायदा हातात घेऊ नका.

(या लेखात वारंवार पुरुष हा उल्लेख आला आहे तो पुरुष व्हीक्टिम कार्ड वगैरेसाठी नाही, तर यासाठी आला आहे की कायद्यानुसार बलात्कार हा फक्त पुरुषच करू शकतो. तरी गैरसमज नसावा.)

**(सोशल मीडियावरून साभार)**

## कवडसा



प्रा.डॉ.मोहन खडसे
9823289010

# 'साद'ला प्रतिसाद असतो...!'

सत्ता, अधिकार, बोलणं, पैसा, क्षमता, दर्जा वगैरे फारसा नसूनही काही लोकांजवळ माणसांचा गोतावळा जाणवतो. कसं काय शक्य आहे हे? कारण ते लोकांसाठी, इतरांसाठी शक्य तेवढं सातत्याने करत असतात म्हणून! काही माणसं इतरांसोबत सुख-दुःखाची देवाणघेवाण सतत करत असतात. प्रश्न आणि अडचणी सोडविण्यासाठी इतरांना सतत मदत करत असतात. मग गोतावळा निर्माण होईल नाही तर काय?



लोक काही सहकार्य करत नाहीत, मदत करत नाहीत, वाईट क्षण लवकर जात नाहीत असं वाटतं कधी कधी, त्यावेळी चांगल्या क्षणांची आठवण करावी म्हणजे ताण तर कमी होतोच, शिवाय आपलंच विचार करण्यात काहीतरी चुकतंय की काय, असाही विचार मनात आला की मन शांत होते.

लोक मनाने, प्रवृत्तीने संकुचित होत आहेत की काय अशी शंका माणसाला येऊ शकते. त्याचं कारणही तसंच आहे. सुख-दुःखाच्या प्रसंगी एक दुसऱ्यामध्ये सहभागी होण्याची माणसांची प्रवृत्ती तशी कमी होत आहे, की काय असं वाटण्यासारखे प्रसंग घडतात. सगळ्यांनाच स्वतःच्या भविष्याची, स्वतःच्या प्रश्नांची, स्वतःच्या आनंदाची अन् 'खाओ पियो और मौज करो' च्या विचारांची सातत्याने काळजी असते, जी साहजिक आहे. मात्र, इतरांबद्दलही काही विचार केला पाहिजे असं सर्वसाधारणपणे माणसांच्या मनात येत नाही, पण माणूस इतरांसाठी काय करतो, त्यांच्या भावनेत किती सहभागी होतो, याचा विचार त्याच्याकडून होत नसल्याने अशी खंत त्याच्या मनात येणं न्यायपूर्ण नाही.

समाजाच्या सहकार्याविषयी, प्रतिसादाविषयी माणसाच्या मनात कुठेतरी नाराजी असू शकते. लोक चर्चा करताना म्हणतात, 'आजकाल नातेसंबंधाची व्यापकता कमी होत आहे म्हणजे अमुक एक माणूस माझ्या नात्यातला आहे, माझा शेजारी आहे, माझ्या गावचा आहे, माझ्या मित्राच्या ओळखीचा आहे म्हणून तो चांगलासुद्धा आहे, अशी भावना आणि त्या भावनेपोटी असलेले कर्तव्य करण्यामध्ये कुचराई करण्याचा माणसाचा प्रयत्न दिसतो. आता पूर्वीसारखी जाणीव, भावनात्मक राहणं काही राहिलेलं नाही. माणसा-माणसातील नातेसंबंधाच्या विविध छटांना मान्यता देत आपले शक्य तितके कर्तव्य पूर्ण करण्याची माणसाची वृत्ती कमी-कमी होत आहे की काय अशी शंका येते कधी कधी. माणसं जरा जास्तच व्यवहारी होत आहेत की काय अशी शंका येते हो. स्वार्थ आणि परमार्थ फार पूर्वीपासून माणसाच्या मनात आणि वागण्यात होता, आता स्वार्थ अधिक आहे परमार्थ कमी-कमी होतो आहे असं अनेकांना वाटतं.' याला माणूस स्वतः कुठेतरी जबाबदार तर नाही ना? समाजाकडून म्हणजेच लोकांकडून अपेक्षा खूप वाढल्या अन् समाजाप्रती कर्तव्य कमी झालं म्हणजे अशी वेगळीच मनःस्थिती होणार नाही तर काय?

सत्ता, अधिकार, बोलणं, पैसा, क्षमता, दर्जा वगैरे फारसा नसूनही काही लोकांजवळ माणसांचा गोतावळा जाणवतो. कसं काय शक्य आहे हे? कारण ते लोकांसाठी, इतरांसाठी शक्य तेवढं सातत्याने करत असतात म्हणून! काही माणसं इतरांसोबत सुख-दुःखाची देवाणघेवाण सतत करत असतात. प्रश्न आणि अडचणी सोडविण्यासाठी इतरांना सतत मदत करत असतात. मग गोतावळा निर्माण होईल नाही तर काय?

लोकांसाठी वेळ नाही मात्र लोकांनी वेळ दिला पाहिजे, अशी अपेक्षाच मुळात माणसाला नाराज करते आणि इतरांप्रती विनाकारण गैरसमज निर्माण करण्याची शक्यता जास्त असते. काहीही म्हणा, माणसं समाजाप्रती, स्वतःच्या जगण्याविषयी दुःखी कष्टी होतात. मग अशावेळी काय करावं? तर जगण्यातील सुमधुर, आनंददायी अशा क्षणांची जाणीवपूर्वक आठवण करावी. आत्ता एखाद्याने अपेक्षित असे सहकार्य कदाचित केले नसेल मात्र भूतकाळात अनेकदा असे सहकार्य केले अन् परिस्थिती सावरून घेतली होती, याचे स्मरण करत राहिल्याने मनःस्थिती सामान्य होण्यास मदत होतेच. एकूण काय तर भूतकाळात घडलेल्या चांगल्या क्षणांची, चांगल्या लोकांची, चांगल्या सहकार्याची आणि मनाला प्रफुल्लित करणाऱ्या गोष्टींची आठवण करून देणे, हे अशा प्रकारच्या समस्यांवर एक उपाय कदाचित असू शकतो हे विसरून कसं चालेल?

कोणत्याही प्रसंगात शक्य तितके सहकार्य लोकांना केले तर लोक नक्कीच आपल्याला ते करत असतात अन् एखाद्या क्षणी त्यांनी जर काही केलं नाही तर लगेच नाराज होण्याची माणसाची प्रवृत्ती असते जी त्याला नेहमी दुःखी गोष्टी करण्यास कारणीभूत ठरते. पुन्हा तेच की जे मिळालं त्याचं समाधान, आनंद आणि कौतुक नाही आणि जे मिळालं नाही त्याचं दुःख, त्याचा त्रास, त्याची चिडचिड, त्याची वेदना माणसाला असू शकते. प्रसिद्ध शायर निदा फाजली त्यांच्या एका गझलमध्ये माणसाच्या या प्रवृत्तीविषयी म्हणतात -

**दुनिया जिसे कहते हैं**
**बच्चे का खिलौना है**
**मिल जाये तो मिट्टी हैं**
**हो जाये तो सोना है**

(प्रस्तुत लेखक हे प्रसिद्ध स्तंभ लेखक, शिक्षणतज्ज्ञ असून त्यांच्या 'सावित्री फाऊंडेशन, अकोला' च्या माध्यमातून सक्रिय सामाजिक, शैक्षणिक कार्य करतात)

अकोला, ईमेल: mvkhadse9@gmail.com

# वरिष्ठाने सुट्टी नाकारली; महिलेचा ऑफिसमध्येच मृत्यू

वृत्तसंस्था

**थायलँड :** थायलँडमध्ये एक घटना घडली आहे. एका महिलेचा ऑफिसमध्येच मृत्यू झाला आहे. या महिलेने आजारपणाची रजा मागितली होती जी नाकारण्यात आली होती. यामुळे ही महिला ऑफिसमध्ये आली होती आणि ऑफिसमध्येच तिचा मृत्यू झाला. थायलँडमधल्या समुत प्रकान भागामधील एका इलेक्ट्रॉनिक उत्पादने निर्मिती कारखान्यामध्ये ही महिला कामाला होती.

३० वर्षांच्या या महिलेला पोटाचा त्रास होता. तिच्या आतड्याला सूज आल्याने तिच्यावर उपचार सुरू होते. महिलेला त्रास होऊ लागल्याने तिने आधी सुट्टी घेतली होती. ५ ते ११ सप्टेंबरपर्यंत ही महिला सुट्टीवर होती. यानंतरही, या महिलेने तिच्या वरिष्ठांना पुन्हा एकदा सुट्टीसाठी विनंती केली होती. १३ तारखेला ही



महिला ऑफिसला गेली होती तेव्हा तिच्या वरिष्ठांनी तिला मेडिकल सर्टिफिकेट जमा करण्यास सांगितले, त्याचवेळी त्याने तिला यापुडे सुट्टी मिळणार नाही असे सांगितले. नोकरी जाईल या भीतीने ही महिला कामावर हजर झाली होती. कामावर येताच अवघ्या २० मिनिटांत ही महिला कोसळली आणि तिचा मृत्यू झाला. नेक्रोटायजिंग एंट्रोकोलायटीस नावाच्या विकाराने ही महिला त्रस्त झाली होती.


# रत्नागिरीतील कर्दे ठरले सर्वोत्कृष्ट कृषी पर्यटन गाव

वृत्तसंस्था

**रत्नागिरी :** महाराष्ट्रातील रत्नागिरीमधील कर्दे गावाला कृषी पर्यटन श्रेणीत सर्वोत्कृष्ट पर्यटन गाव पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला आहे. भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने जागतिक पर्यटन दिनानिमित्त या प्रतिष्ठित पुरस्काराची घोषणा केली होती. या स्पर्धेत सहभागी झालेल्या ३० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील ९९१ गावांपैकी आठ वेगवेगळ्या श्रेणींमध्ये ३६ गावांची विजेते म्हणून निवड करण्यात आली होती. स्थानिक अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या कृषी पर्यटनाला चालना देण्याच्या प्रयत्नांसाठी कर्दे गावाला मान्यता मिळाली.

रत्नागिरीच्या किनारपट्टीवर

**केंद्र सरकारच्या पुरस्कारांचे वितरण**



वसलेले कर्दे हे गाव स्वच्छ समुद्रकिनारे, पांढरी वाळू आणि नयनरम्य परिसर यामुळे पर्यटकांना आकर्षित करत आहे. हा पुरस्कार महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे आणि यामुळे राज्याच्या पर्यटन विकासाला चालना मिळेल अशी अपेक्षा आहे. २०२३ मध्ये सुरू झालेल्या या स्पर्धेचा उद्देश ग्रामीण पर्यटनाला चालना देणे आणि त्यांच्या भागातील पर्यटनाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या गावांच्या प्रयत्नांना मान्यता देणे हा आहे. सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारसा संवर्धन, समुदाय-आधारित पर्यटन आणि शाश्वत विकास यासारख्या क्षेत्रातील त्यांच्या उपक्रमांच्या आधारे विजेत्यांची निवड करण्यात आली आहे. कृषी पर्यटन, महिला सक्षमीकरण आणि शाश्वत विकासासाठीच्या नावीन्यपूर्ण दृष्टिकोनांसाठी कर्दे गावाची निवड करण्यात आली. गावाने पर्यावरणीय पर्यटनाला चालना देण्यासाठी नैसर्गिक संसाधनांचा वापर, जल व्यवस्थापन आणि कचरा व्यवस्थापन यासह विविध उपक्रम राबवले आहेत. शाश्वत पर्यटनाला चालना देण्याच्या गावाच्या प्रयत्नांची आणि स्थानिक पर्यावरण आणि संस्कृती जतन करण्याच्या त्याच्या वचनबद्धतेची मान्यता म्हणून हा पुरस्कार दिला जातो.



## दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात चार जवान जखमी

# चकमकीत दोन दहशतवादी ठार

वृत्तसंस्था

**कुलगाम :** जम्मू-काश्मीरमध्ये १ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या तिसऱ्या टप्प्यातील मतदान आणि शनिवारी पंतप्रधान मोदींच्या रॅलीपूर्वी कुलगाममध्ये आज सकाळी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. आदिगम देवसर परिसरात ही चकमक सुरू झाली. सुरक्षा दलांनी दोन दहशतवाद्यांचा खात्मा केला. त्याचवेळी चार जवान जखमी झाले. असे सांगण्यात येत आहे की, इनपुट मिळाल्यानंतर सुरक्षा दल शोध मोहीम राबवत होते. त्यानंतर अचानक दहशतवाद्यांनी गोळीबार केला. यानंतर सुरक्षा दलांनी प्रत्युत्तर दिले. यानंतर दोन्ही बाजूंनी गोळीबार सुरू झाला. सुरक्षा दलाच्या घेऱ्यात दोन ते तीन दहशतवादी अडकले. यानंतर काश्मीर झोन पोलिसांनी ट्विट करून दोन दहशतवाद्यांचा खात्मा केला आहे.

गावात अजूनही दहशतवादी लपून बसल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सुरक्षा दलांनी परिसर पूर्णपणे सील केला असून ऑपरेशन यशस्वी करण्यासाठी जास्तीत जास्त दक्षता घेतली जात आहे. कोणतीही हानी होऊ नये म्हणून स्थानिक लोकांना घटनास्थळापासून दूर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

हे ऑपरेशन संयुक्त सैन्याकडून मिळालेल्या गुप्तचर माहितीवर आधारित आहे, ज्यात लष्कर, पोलीस आणि इतर सुरक्षा संस्थांचा समावेश आहे. ही कारवाई अजूनही सुरू असून परिसरात सुरक्षा दलांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या चकमकीमुळे परिसरात तणावाचे वातावरण असून, प्रशासन परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहे.

### चकमकीनंतर लष्कराने शोधमोहीम सुरू

या चकमकीत चार सुरक्षा कर्मचारी आणि एक वाहतूक पोलीस अधिकारी जखमी झाले आहेत. सुरक्षा दलांनी घेराबंदी आणि शोध मोहीम सुरू केल्यानंतर, जिल्ह्याच्या देवसर भागातील आदिगाम गावात गोळीबार सुरू झाला, चकमक स्थळाजवळ गोळी लागल्याने मुमताज अली जखमी झाले. दहशतवादविरोधी कारवाईत सहभागी असलेले चार सुरक्षा कर्मचारी जखमी झाल्याचे त्यांनी सांगितले. दहशतवाद्यांची ओळख अद्याप पटलेली नाही. चकमकीनंतर लष्कराने उच्चस्तरीय शोधमोहीम सुरू केली आहे. सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे.

# ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्समध्ये भारताचा ३९वा क्रमांक

## केंद्रीयमंत्री पीयूष गोयल यांचे ट्विट

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्ली :** जिनिव्हा-आधारित जागतिक बौद्धिक संपदा संघटनेच्या अहवालानुसार, ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्स (GII) २०२४



क्रमवारीत समावेश असलेल्या एकूण १३३ देशांत भारताने ३९ वा क्रमांक पटकावला आहे. गेल्या वर्षी भारत ४० व्या क्रमांकावर होता. केंद्रीयमंत्री पीयूष गोयल यांनी यासंदर्भात ट्विट करत माहिती सार्वजनिक केली. WIPO च्या ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्स (GII) 2024 नुसार स्वित्झर्लंड, स्वीडन, युनायटेड स्टेट्स, सिंगापूर आणि युनायटेड किंगडम या जगातील सर्वात इनोव्हेटिव्ह अर्थव्यवस्था आहेत, तर चीन, तुर्किये, भारत, व्हिएतनाम आणि फिलीपिन्स या देशांनी गेल्या १० वर्षांत सर्व क्षेत्रांत सर्वोत्कृष्ट कामगिरी केली आहे. १३३ अर्थव्यवस्थांच्या क्रमवारीत चीन ११व्या क्रमांकावर पोहोचला आहे.

# बांगलादेशी एपीएसीमध्ये घुसले कसे?

## नरेंद्र पाटील यांचा थेट गृहमंत्र्यांना सवाल

वृत्तसंस्था...

**नवी मुंबई :** मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) मार्केटमध्ये काही वर्षांपासून बांगलादेशी मजुरांची घुसखोरी वाढल्याची चर्चा होती.



मात्र, माथाडींचे नेते नरेंद्र पाटील यांनी एपीएमसीमध्ये तब्बल ४ ते ५ हजार बांगलादेशींनी घुसखोरीचा गंभीर आरोप करून खळबळ उडवून दिली आहे. विशेष म्हणजे नरेंद्र पाटील यांनी उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच एपीएसीमध्ये बांगलादेशी घुसलेच कसे, असा सवाल करत गृहमंत्र्यांना खिंडीत पकडले आहे. अण्णासाहेब पाटील यांच्या ९१ व्या जन्मदिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनने कार्यक्रम आयोजित केला होता.

# पाकिस्तान हा दहशतवादाचा कारखाना!

## भारताने यूएनमध्ये पाकला सुनावले खडेबोल

वृत्तसंस्था

**न्यूयॉर्क :** पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी संयुक्तराष्ट्रांमध्ये (यूएन) काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला होता, ज्यावर भारताने आता पाकला सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. भारतीय मुत्सद्दी भाविका मंगलानंदन यांनी ळर्उं मध्ये उत्तर देण्याच्या अधिकारादरम्यान पाकिस्तानी पंतप्रधानांच्या भाषणाला एक 'विनोद' म्हणून संबोधले. तसेच पाकिस्तानला दहशतवादाची फॅक्टरी म्हटले.

पाकिस्तानी पंतप्रधानांना प्रत्युत्तर देताना भाविका मंगलानंदन यांनी, 'जम्मू-काश्मीरमध्ये होणाऱ्या



विधानसभा निवडणुकांवर प्रभाव टाकण्यासाठी पाकिस्तानने दहशतवादाचा वापर केला आहे,' असा आरोप यावेळी त्यांनी केला. पुढे भाविका मंगलानंदन म्हणाल्या की, 'पाकिस्तानने जगात कुठेही हिंसाचाराच्या विरोधात बोलणे हा दांभिकपणा आहे. भारतीय मुत्सद्दी भाविका मंगलानंदन यांनी यावेळी, 'आज सकाळी या विधानसभेत (यूएन) एक हास्यास्पद घटना घडली ही खेदाची बाब आहे. मी पाकिस्तानी पंतप्रधानांच्या भाषणातील भारताच्या संदर्भाबाबत बोलत आहे. जगाला माहीत आहे की, पाकिस्तान त्याने आपल्या शेजाऱ्यांविरुद्ध सीमापार दहशतवादाचा शस्त्र म्हणून वापर केला आहे, आपल्या संसदेवर, आपली आर्थिक राजधानी मुंबईवर हल्ला केला आहे, ही यादी पुढे आहे. कुठेही हिंसाचारावर बोलणे हा पाकिस्तानचा सर्वात मोठा ढोंगीपणा असल्याचे भारतीय राजनयिक भाविका मंगलानंदन यांनी म्हटले आहे.

### दिल्ली स्थायी समितीच्या निवडणुकीत भाजप विजयी

**नवी दिल्ली:** दिल्ली महानगरपालिकेच्या १८ सदस्यीय स्थायी समितीची शेवटची रिक्त जागा भारतीय जनता पार्टीने बिनविरोध जिंकली. सत्ताधारी आम आदमी पार्टी आणि काँग्रेसच्या नगरसेवकांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकला होता. भाजपचे उमेदवार सुंदर सिंह यांना पक्षाच्या सर्व ११५ नगरसेवकांची मते मिळाली, तर आपच्या निर्मला कुमारी यांना एकही मत मिळाले नाही. स्थायी समिती ही दिल्ली महानगरपालिकेची सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था आहे. या निवडणुकीच्या निकालामुळे भाजपच्या पॅनलमध्ये आता १० सदस्य आहेत तर सत्ताधारी आपचे केवळ आठ सदस्य आहेत.

# शहबाज शरीफ यांनी केला पुन्हा काश्मीरचा मुद्दा उपस्थित

**संयुक्त राष्ट्र :** पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी संयुक्त राष्ट्राच्या महासभेमध्ये पुन्हा एकदा जम्मू-काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला आहे. या मुद्यावरील शांततापूर्ण तोडग्यासाठी जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० कलम भारताने पुन्हा लागू करायला हवे आणि चर्चेला सुरुवात करायला हवी, असे शरीफ म्हणाले.

संयुक्त राष्ट्राच्या महासभेच्या ७९ व्या सत्रामध्ये शरीफ हे काश्मीरचा मुद्दा उपस्थित करतील, अशी शक्यता वर्तवली जातच होती. त्यानुसार ३७० कलमाच्या अनुषंगाने त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला आहे. आपल्या २० मिनिटांच्या भाषणामध्ये शरीफ यांनी काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला. पॅलेस्टिनी नागरिकांप्रमाणेच जम्मू-काश्मीरच्या नागरिकांनीही स्वातंत्र्य आणि स्वयंनिर्णयाच्या हक्कासाठी शतकभरापासून संघर्ष केला आहे. एकतर्फीपणे आणि बेकायेदेशीरपणे २०१९ साली रद्द केलेले राज्यघटनेतील ३७० वे कलम स्थायी शांततेसाठी आणि संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षाविषयक ठरावाच्या अनुषंगाने भारताने जम्मू-काश्मीरच्या लोकांच्या मताचा आदर करून पुन्हा लागू केले पाहिजे, असे शरीफ म्हणाले.

# काँग्रेसने दिले जाहीरनाम्यात अनेक आश्वासने

वृत्तसंस्था

**चंदीगढः** हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने चंदीगडमध्ये आज आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. काँग्रेसच्या ४० पानी जाहीरनाम्यात पक्षाने जनतेला २५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार आणि महिलांना दरमहा २,००० रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे. याशिवाय सतलज-यमुना लिंक (SYL) कालव्यातून पाणी घेण्याचे महत्त्वाचे आश्वासन देण्यात आले

### २५ लाख रुपयांचे मोफत उपचार

आहे. याच्या सात दिवसांपूर्वी दिल्लीत काँग्रेसने हरियाणातील



जनतेसाठी सात हमीभाव जाहीर केले होते. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या नेतृत्वाखाली सात आश्वासने आणि ठाम विश्वासाच्या नावाने ते प्रसिद्ध झाले.

# एकाच कुटुंबातील पाच जणांची आत्महत्या

## चारही मुली होत्या अपंग

**नवी दिल्ली:** दिल्लीतील वसंत कुंज परिसरात एकाच कुटुंबातील पाच जणांनी आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना समोर आलीय. ही घटना रंगपुरी गावात घडली. माहिती मिळाल्यानंतर पोलीस या प्रकरणाचा तपास करण्यात व्यस्त आहेत. पीडितेच्या चारही मुली अपंग असल्याचे सांगण्यात येत आहे.

दिल्लीतील वसंत कुंज परिसरातील रंगपुरी गावात एकाच कुटुंबातील पाच जणांनी विषारी द्रव्य प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी शेजाऱ्यांनी पोलिसांना कळवल्यानंतर उघडकीस आली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले असता खोलीचा दरवाजा आतून बंद होता. दरवाजा तोडला असता पाच कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आले. पोलिसांनी मृतदेह बाहेर काढले. सध्या पोलीस या प्रकरणाच्या तपासात व्यस्त आहेत. एका व्यक्तीने आणि त्याच्या चार मुलींनी आत्महत्या का केली, याचा शोध घेण्याचा पोलीस प्रयत्न करत आहेत. दिल्ली पोलिसांच्या म्हणण्यानुसार, सुरुवातीच्या तपासात असे दिसते की वडिलांनी आधी विषारी द्रव्य सर्वांना खायला दिले आणि नंतर स्वतः खाल्ले. शवविच्छेदन अहवाल आणि तपासानंतर घटनेचा क्रम कळेल, असे पोलिसांचे म्हणणे आहे.




**बारामती :** माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत बारामती नगरपालिकेस नगरपरिषद व नगरपंचायत विभागात राज्यस्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. या मुळे बारामती नगरपालिकेस पाच कोटी रुपयांचे पारितोषिक प्राप्त होणार आहे. मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी या बाबत माहिती दिली.

### भारतीय लेखिकेला लंडनमध्ये मारहाण

**लंडन:** ग्रीनकार्ड इंक.च्या दोन वेळा लेखिका आणि सह-संस्थापक सौंदर्या बालसुब्रमण्य यांना मारहाण झाली आहे. लंडनमध्ये भरदिवसा रस्त्यावर त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. सुश्री बालसुब्रमण्यम यांनी इन्स्टाग्रामवर याबाबत सांगितले आहे. सोबत त्यांनी फोटोही शेअर केले आहे. ही घटना १८ सप्टेंबर रोजी घडली, जेव्हा त्या लंडनच्या रस्त्यांवर सह-कार्यासाठी जागा शोधत होत्या. दुपारी दोनच्या सुमारास एक उंच व्यक्ती त्यांच्याकडे आला आणि त्याने पैसे मागितले. मात्र, यावेळी त्यांनी नकार दिला यावेळी त्या व्यक्तीने त्यांच्या तोंडावर मारहाण करण्यास सुरुवात केली असे त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत सांगितले आहे.

# अमेरिकेला हेलन चक्रीवादळाचा जोरदार तडाखा

## ४४ जणांचा मृत्यू, तर शेकडो जखमी

वृत्तसंस्था

**वॉशिंग्टन :** २२५ किमी प्रतितास वेगाने आलेल्या हेलन चक्रीवादळामुळे फ्लोरिडा आणि दक्षिण-पूर्व अमेरिकेत प्रचंड विध्वंस झाला आहे. यामुळे आतापर्यंत किमान ४४ जणांचा मृत्यू झाला असून शेकडो लोक जखमी झाले आहेत. हेलन चक्रीवादळामुळे किमान ३५ लाख घरांतील १.२० कोटी लोकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. दरम्यान बचाव पथकातर्फे लोकांना वाचवण्यासाठी बचावकार्य सुरू करण्यात आले आहे.

हेलेन चक्रीवादळामुळे अमेरिकेतील फ्लोरिडा, जॉर्जिया, नॉर्थ कॅरोलिना, साउथ कॅरोलिना,



व्हर्जिनिया आणि अलाबामामध्ये आणीबाणी घोषित करण्यात आली आहे. या राज्यांमध्ये किमान १००० उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. त्यामुळे सुमारे ४ हजार उड्डाणांवर परिणाम झाला आहे. येथील नद्यांतील वाढत्या पाण्यामुळे रुग्णवाहिका आणि आपत्कालीन वाहने रुग्ण आणि इतर लोकांना बाहेर काढण्यात कमी पडत आहेत. यामुळे आपत्कालीन पथके बोटी आणि हेलिकॉप्टरमधून बचावकार्य सुरू आहे.

# सोन्याच्या खाणीत भूस्खलनामुळे 15 ठार

### १२ बेपत्ता

**पेदांग, (इंडोनेशिया) :** इंडोनेशियात सध्या सुरू असलेल्या संततधार पावसामुळे एका बेकायदेशीर सोन्याच्या खाणीत भूस्खलन झाले असून या दुर्घटनेत किमान १५ कामगार ठार झाले आहेत. तर डझनभर अन्य कामगार बेपत्ता आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

पश्चिम सुमात्रा प्रांतातील दुर्गम सोलोक जिल्ह्यात ग्रामस्थ सोन्याच्या कणांसाठी गुरुवारी खोदकाम करत होते तेव्हा आजूबाजूच्या डोंगरांवरचा चिखल खाणीत कोसळला आणि हे कामगार गाडले गेले, असे स्थानिक आपत्ती निवारण एजन्सी कार्यालयाचे प्रमुख इरवान एफेंडी यांनी सांगितले.

### टाटा इलेक्ट्रॉनिक कंपनीत भीषण आग

**होसूर :** तामिळनाडूमधील टाटा इलेक्ट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या गोदामात आज (दि. २८) सकाळी आग लागली. अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. आगीची माहिती मिळताच होसूर आणि आसपासच्या जिल्ह्यातील एकूण सात अग्निशमन गाड्या घटनास्थळी रवाना झाल्या तामिळनाडूमधील टाटा इलेक्ट्रॉनिक्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या गोदामात आज (दि. २८) सकाळी आग लागली

# तुवालू बेटाच्या अस्तित्वावर संकट

वृत्तसंस्था

**वॉशिंग्टन :** प्रशांत महासागरात नऊ लहान बेटांवर वसलेले तुवालू हे बेट आपल्या अस्तित्वाच्या संकटाला तोंड देत आहे. अस्तित्व संपण्याच्या या भीतीमुळे लोक मुलं जन्माला घालण्याच्या विचार करत नाहीत. या बेटाची लोकांची संख्या फक्त ११ हजार इतकी आहे. तुवालूची समुद्रसपाटीपासूनची उंची फक्त २ मीटर (६.५६ फूट) आहे. गेल्या तीन दशकांत होत असलेली तापमानवाढ आणि हवामान बदलामुळे समुद्राची पातळी १५ सेमी (५.९१ इंच) वाढली आहे. समुद्राच्या पातळीत सुमारे सहा इंच वाढ झाली आहे.

स्थानिक रहिवासी फुकानोई लाफई यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे लोक कुटुंब वाढवण्याची योजना आखत आहेत; परंतु त्यांची मुले मोठी होईपर्यंत बेट समुद्रात बुडून जाईल अशी भीती वाटत आहे. या भीतीमुळे लोक मुले जन्माला घालण्याच्या विचारात नाहीत, कारण त्यांना भविष्याची चिंता वाटतेय.

### तुवालू आणि ऑस्ट्रेलियात एक करार

पूर्वी ते एलिस बेट म्हणूनही ओळखले जात असे. ऑस्ट्रेलियादरम्यान ते पॅसिफिक महासागरात स्थित आहे. व्हॅटिकन सिटीनंतर हा जगातील सर्वात कमी लोकसंख्या असलेला देश आहे. २०२३ मध्ये तुवालू आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात एक करार झाला आहे. याअंतर्गत, २०२५ पासून दरवर्षी २८० लोकांना ऑस्ट्रेलियात कायमचे विस्थापित केले जाणार आहे.

### भरतीमुळे बेट जाईल पाण्याखाली



दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

# गरजू मुलींच्या शिक्षणाचा खर्च उचणार:सुषमा चोरडिया

सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्युटचे कार्य उल्लेखनिय

सूर्यदत्ता कॉलेज ऑफ नर्सिंग उत्कृष्ट नर्सेस घडवण्याचे ठिकाण

विदार्थ्यांनींना दिले जाते शिक्षणाची उत्तम संधी



पुणे/ पुण्यभूमी प्रतिनिधी

पुण्यातील सूर्यदत्ता कॉलेज ऑफ नर्सिंग विद्यार्थ्यांना नर्सिंगच्या क्षेत्रात उच्च दर्जाचे शिक्षण आणि व्यापक प्रशिक्षण देण्यासाठी नव्याने पुढे आले आहे. नर्सिंग क्षेत्रात कुशल आणि तज्ज्ञ व्यावसायिक निर्माण करणे, या उद्देशाने ही संस्था सुरु करण्यात आली आहे. या महाविद्यालयाने अत्याधुनिक शिक्षण तंत्र, वैद्यकीय सुविधा, आणि प्रत्मक्ष अनुभव यांचा संगम साधून विद्यार्थ्यांसाठी आदर्श व्यासपीठ उभारले आहे.सूर्यदत्ता कॉलेज ऑफ नर्सिंग विद्यार्थ्यांना केवळ नर्सिंगचे पुस्तकी धडे शिकवत नाही, तर त्याचा प्रत्मक्ष रुग्णसेवा करताना कसा वापर करावा, याचे प्रशिक्षणही देण्यावर भर दिला जातो. आधुनिक काळात शिक्षणात आमूलाग्र बदल झाले आहेत. त्यानुसार नावीन्सपूर्ण तांत्रिक साधने आणि उपकरणे विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जातात. त्यामुळे ते रुग्णालयातील प्रत्यक्ष परिस्थितीला सामोरे जाण्यास सक्षम होतात. नर्सिंग क्षेत्रातील अद्ययावत अभ्यासक्रम आणि विविध तांत्रिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी महाविद्यालयात अत्याधुनिक प्रयोगशाळा, सुसज्ज लॅब्स, आणि संगणक सुविधा आहेत.

सूर्यदत्ता कॉलेजचे प्राध्यापकवर्ग हे नर्सिंग आणि वैद्यकीय क्षेत्रात अनुभवी व कुशल आहेत. त्यांच्याकडून विद्यार्थ्यांना नर्सिंगच्या तांत्रिक बाबींचा सखोल अभ्यास करण्याची संधी मिळते. प्राध्यापक विद्यार्थ्यांना वैद्यकीय क्षेत्रातील संशोधन, नावीन्यूपूर्णता, आणि सर्जनशीलतेवर मार्गदर्शन करतात. यामुळे विद्यार्थ्यांना वैद्यकीय सेवा क्षेत्रात उत्तम तज्ज्ञ होण्यासाठी आवश्यक कौशल्ये मिळतात. सूर्यदत्ता कॉलेज ऑफ नर्सिंगच्या विद्यार्थ्यांना विविध नामांकित रुग्णालयांमध्ये प्रत्मक्ष प्रात्यक्षिक अनुभव मिळतो. या रुग्णालयांमध्ये विद्यार्थ्यांना रुग्णांची काळजी कशी घ्यावी, उपचारांची योजना कशी करावी, आणि रुग्णांची मानसिक तसेच शारीरिक स्थिती कशी हाताळावी हे शिकवले जाते. प्रत्मक्ष अनुभवामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि ते व्यावसायिक जीवनात सक्षमपणे काम करू शकतात. सूर्यदत्ता नर्सिंग कॉलेज विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक पान २ वर...

### या ठिकाणी संपर्क साधण्याचे आवाहन!

सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस् सूर्यदत्ता नर्सिंग कॉलेज ऑफ नर्सिंग, पॅरामेडिकल सायन्सेस अँड टेकनॉलॉजि, पुणे. बावधन, मुळशी तालुका, पुणे – ४११०२१ गरजू मुलींसाठी शिक्षणाचा सर्व खर्च सूर्यदत्तातर्फे केला जाईल परंतु राहण्याचा आणि खाण्याचा खर्च प्रत्मक्ष स्मृतः विधार्थिनींना करावा लागेल. सोबत सूर्यदत्ता नर्सिंग कॉलेज ऑफ नर्सिंग, पॅरामेडिकल सायन्सेस अँड टेकनॉलॉजि, पुणेचे माहितीपत्रक आणि प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्राची यादी सोबत जोडत आहोत. प्रवेश प्रक्रियेची अंतिम मुदत १५ ऑक्टोबर आहे आणि अर्ज स्वीकारण्याची तारीख १० ऑक्टोबर असेल. कृपया याची नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी ु.लिर्पीीी.ीस/ या संकेतस्थळावर, तसेच ७७७६०७२०००, ८९५६९३२४०० किंवा ८९५६३६०३६० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्या सहयोगी उपाध्यक्षा डॉ. किमया गांधी यांनी केले.

## सोयाबीन काढणीतच पावसाचा राडा!

अस्मानी: शेतकरी वर्ग सापडला अडचणीत



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील माळेगाव परिसरात दि. २३ सप्टेंबर पासून परतीच्या पावसाने सातत्याने हजेरी लावल्याने काढणीला आलेल्या सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. सततच्या पावसाने शेतीत सखल भागात पाणी साचून राहिल्यामुळे वापसा झालेला नाही. तर काही ठिकाणी सोयाबीन पाण्यात असल्याने काढणी खोळंबली आहे. सोयाबीन तर काढायला आलेला आहे. मग चिखलात सोयाबीन काढण्यासाठी एकरी सात हजार रूपये गुत्ते मजूर मागत आहेत. त्यामुळे ऐन काढणीच्या वेळीच पावसाने राडा केल्याने उत्पादन खर्चात वाढ होत असल्याने शेतकरी हातबल. झाली आहेत. यंदा बऱ्याच वर्षानंतर खरिपात पेरणी झाल्याने पिके जोमात आली वाढ ही चांगली झाली परंतु ऐन काढणीच्या वेळी परतीचे पावसाने घाना घातलाच आहे. मिळेल ते पदरात पाडून घेण्याचा विचार शेतकरी करीत असताना दोन दिवसांपासून पडत असणाऱ्या पावसाने शेतकऱ्याचे अधिकचे नुकसान झाले आहे. यावर्षी वेळेत पेरण्या झाल्यामुळे खरीप हंगामातील पिकांमधून आर्थिक उत्पन्न होईल, अशी आशा शेतकऱ्यांना होती. मात्र

## माजलगावमध्ये वाहू लागले निवडणूक वारे!

पडघम: प्रा.ईश्वर मुंडेंचा गाव भेट दौऱ्याची शंभरी



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक कांही दिवसावर येऊन ठेपली आहे.माजलगाव मतदार संघात पावसाने वातावरण गारे गार केलेले आसले तरी महा युतीचे घड्याळ कोणाला मिळेल? महा विकास आघाडीची तुतारी कोणाला मिळेल ? खा.शरद पवार यांना कोण कोण भेटले या चर्चेने वातावरण गरम झालेले आहे. तुतारी कडे कोण येणार अन तुतारी कोणाला भेटणार या चर्चेत न आडकता माजलगाव विधानसभा मतदार संघात आपल्यालाच उमेदवारी भेटेल व आपणच तुतारी वाजवू या अपेक्षेने प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे हे मात्र पायाला भिंगरी बांधून माजलगाव मतदार संघ पिंजून काढत आसल्याचे चित्र दिसत आहे.बीड जिल्हा परिषदेमध्ये शिक्षक ते शिक्षण विस्तार अधिकारी पदावर नौकरी करून खा.शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून स्वेच्छा सेवा निवृत्ती घेऊन सक्रीय समाजकारण व राजकारण करणारे प्रा.ईश्वर मुंडे बीड लोकसभा निवडणूकीच्या वेळी उमेदवारीच्या चर्तेत आलेले होते.

माजलगाव मतदार संघाचे शेवटचे टोक व आपले स्वत:चे गाव गांजपूर येथून आपल्या आई–वडीलांच्या उपस्थितीत सुरू केलेल्या गाव भेट दौरा कार्यक्रमाने मतदार संघातील धारूर व वडवणी तालुक्यांतील शंभर गावे पूर्ण केलेली आहेत. आपल्या गाव भेट दौऱ्याचा फार गाजावाजा न करता, किती मानसे उपस्थीत राहतील याची काळजी न करता, शक्य होतील तेवढेच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सोबत घेऊन सकाळी आठ ते संध्याकाळी आठ पान २ वर...

## ट्रकने दुचाकीस स्वारास चिरडले!

अपघात: परळीमध्ये आठवड्यात दुसरा बळी



परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरातील रेल्वे उड्डाणपुलावर पडलेल्या मोठ्या खड्ड्यामुळे ट्रक आणि मोटरसायकलचा भीषण अपघात झाला. या अपघातात मोटरसायकल वरील एकाचा मृत्यू झाला तर एक जण जखमी असल्याचे समजते. मृत व्यक्तीचे नाव प्रवेश कुमार राहणार सदाचौरी, इटावा, उत्तरप्रदेश येथील असल्याची माहिती कळते. उडान पुलावर अपघातात आठवड्यातील हा दुसरा बळी ठरला आहे. संभाजी नगर पोलीस स्टेशन ने यावर उपाययोजना कराव्यात, कुठल्याही उड्डाण पुलावर ऑटोरिक्षा थांबा किंवा बस थांबा नसतो परंतु पोलिसांच्या दुर्लक्ष मुळे सदरील घटना घडत आहेत.दरम्यान पुलावरील खड्डे बुजवण्याची मागणी गेल्या अनेक महिन्यापासून परळीकर करीत असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने खड्डे बुजवले जात नाहीत. त्यामुळे या अपघातास बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी नागरिकातून होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, शनिवार दिनांक २७ सप्टेंबर सायंकाळी ७ च्या सुमारास रेल्वे उड्डाण पुलावर ट्रक आणि मोटरसायकलचा भीषण अपघात झाला. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला तर एक जण जखमी असल्याचे समजते .उडान पुलावर पडलेल्या खड्ड्यामुळे हा अपघात झाल्याचे बोलले जात आहे. दरम्यान अपघात घडल्यानंतर तब्बल अर्ध्या तासानंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले व मयतास उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले. उड्डाणपूलावरील खड्डे हे वाहनधारकांसाठी धोकादायक बनलेले आहेत .शहरातील विविध पक्ष, व सामाजिक संघटना तसेच कार्यकर्त्यांनी खड्डे बुजवण्याची मागणी बांधकाम पान २ वर...

## प्राथमिक आरोग्य केंद्र ठरतेय वरदान

दिलासा: खंडेश्वर विद्यालयात आरोग्य विषयी मार्गदर्शन!



कुसळंब/पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील कुसळंब येथे नव्याने सुरू झालेलं प्राथमिक आरोग्य केंद्र परिसरातील नागरिकांसाठी ठरू लागले वरदान. गेल्या दोन महिन्यापासून सुरू असून या ठिकाणी ३ हजाराच्या वर नागरिकांनी उपचार घेतले आहेत. नागरिक या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्राचे व वैद्यकीय अधिकारी डॉ. अरबाज पठाण यांच्यासह सर्व कर्मचारी वर्गाच्या कामाबद्दल समाधान व्यक्त करत आहे.

नुकतच काही महिन्यापूर्वी प्राथमिक आरोग्य केंद्र कुसळंबचे उद्घाटन झाले आहे. उद्घाटन झाल्यापासून पान २ वर...

## महाराष्ट्र हितासाठी हात बळकट करा

डॉ.ज्योतीताई वाघमारे : बीड विधानसभा पूर्व नियोजन बैठक



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन चालणारे महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय, कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब जनतेसाठी अठरा–अठरा तास काम करत असून महाराष्ट्र राज्यातील महिला–भगीनी ,शेतकरी, कष्टकरी, तरुण, गोरगरीब अशा सर्व स्तरावरील माणसांचा सक्षम आधार बनले आहेत. सर्व सामान्यांच्या हिताच्या योजना राबवत त्यांनी मी जनतेचा सेवक असल्याचे सिद्ध केले आहे. विधानसभा निवडनुका तोंडावर येऊन ठेपल्या असून आता शिवसैनिकांना महाराष्ट्र हितासाठी मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे हात बळकट करण्याची वेळ आली आहे. एकनाथजी शिंदे साहेबांना पुन्हा एकदा मुख्यमंत्री बनवून महाराष्ट्रावर शिवसेनेचा भगवा आपल्याला फडकवायचा आहे त्यामुळे शिवसैनिकांनो सज्ज व्हा, हाडाची काड करून कामाला लागा असे प्रतिपादन शिवसेनेच्या उप नेत्या प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योतीताई वाघमारे यांनी बीड विधानसभा पूर्व नियोजन बैठक व शिवदूत/बूथ प्रमुख मेळाव्यात केले.

काल दु १२.०० वाजता हॉटेल नीलकमल येथे बीड विधानसभा पूर्व नियोजन बैठक शिवदूत/बूथ प्रमुख मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यात शिवसेना प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योतीताई वाघमारे यांनी ऑनलाईन प्रणाली द्वारे शिवसेना महिला आघाडी, युवसेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी, शिवदूत/बूथ प्रमुख यांच्याशी पान २ वर...

### ज्योतीताई वाघमारेंकडून विशेष कौतुक

बीड शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी बीड जिल्ह्यात शिवसेना पक्ष बांधणीचे उल्लेखनीय कार्य केले असून बीडमधून उबाठा नेस्तानाबूत केला आहे. मुख्यमंत्री शिंदे साहेबांच्या विजयात नक्कीच जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांचा मोठा वाटा असणार आहे अशी भावना शिवसेनेच्या उप नेत्या प्रवक्त्या प्रा. डॉ. ज्योतीताई वाघमारे यांनी व्यक्त केली.

## होम मिनिस्टर कार्यक्रमाची जय्यत तयारी

मनीषा कोकाटे:महिलांनी नाव नोंदणी करावी



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शिवसंग्रामच्या वतीने नवरात्र उत्सवात जागर मातृ शक्तीचा हे अभियान राबवण्यात येणार आहे. यानिमित्त नवरात्र काळात संबंध महाराष्ट्रत महिलांमध्ये प्रचंड लोकप्रिय असणारा होम मिनिस्टर (खेळ रंगला पैठणीचा) हा भव्य कार्यक्रम दि. ०७ ऑक्टोबर रोजी दुपारी ११ वा. आशीर्वाद मंगल कार्यालय, बार्शी रोड, बीड येथे शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी आयोजत केला आहे. या कार्यक्रमासाठी महिलांनी ८९७२१४७२७२ या क्रमांकावर नाव नोदणी करावी असे आवाहन पंचायत समितीच्या मा.सभापती मनीषा कोकाटे यांनी केले आहे.

शिवसंग्रामच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या होम मिनिस्टर (खेळ रंगला पैठणीचा) हा भव्य कार्यक्रमाला महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून या कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू आहे. महिलांच्या जिवाला थोडा विरंगुळा पाहिजेच यासाठीच या कार्यक्रमाचे आयोजन शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांनी केले आहे. या कार्यक्रमात पारंपरिक खेळांबरोबर यंदा महिलांना होम मिनिस्टर सारखे आधुनिक खेळही खेळायला मिळणार आहेत. जोडीला आणखीही बरेच स्पर्धात्मक उपक्रम आहेत. यात भाग घेणाऱ्या महिलांसाठी मोठ–मोठी बक्षिसं मिळणार आहेत. पान २ वर...

## डॉ.सारिका क्षीरसागर — रायमोहमध्ये आरोग्य शिबिरात रूग्णांची गर्दी

# गरजूंना आरोग्य सेवा देणे कर्तव्य



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राजकारण करताना आम्ही सामाजिक कार्यावर अधिक भर देतो. माझ्यासह डॉ.योगेश हे आरोग्य क्षेत्रात असल्याने गरजूंना आरोग्य सेवा देणे आमचे कर्तव्य आहे. त्यामुळे आरोग्य शिबिरांचा राजकारणाशी कुणीही संबंध जोडू नये, असे प्रतिपादन कल्पतरूच्या सचिव डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी केले.

शिरूर कासार तालुक्यातील रायमोह येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने मोफत आरोग्य शिबिराचे रविवारी (दि.२९) आयोजन केले होते. यावेळी उद्घाटक म्हणून डॉ.सारिकाताई क्षीरसागर ह्या बोलत होत्या.व्यासपीठावर ह.भ.प.अतुल महाराज शास्त्री, ह.भ.प.नारायण महाराज डिसले, राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, स्त्री रोग तज्ञ डॉ.सुनिल तिडके, जनरल फिजीशिअन डॉ.संतोष धूत, नेत्र रोग तज्ञ डॉ.एकनाथ पवार, वसंत सानप, संतोष कंठाळे, मधुकर भोसले, अशोक इंगळे, शिवमूर्ती सानप, साईनाथ कैतके, प्रदीप सानप, चिंतामण नागरगोजे, बालाजी गिते, कैलास जाधव, सुदर्शन सांगळे, बाळकृष्ण ढाकणे, शोभा सरवदे, अनिकेत सानप, मंगेश सानप, रोहिण शेख, मिलन उगले, साईनाथ मिसाळ, प्रवीण सानप, दिलीप जायभाये आदींची उपस्थिती होती. या आरोग्य शिबिरात डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह खाजगी, शासकीय डॉक्टरांनी रूग्णसेवा दिली. तज्ञ डॉक्टरांनी १ हजार १४२ रूग्णांची तपासणी केली. यापैकी ५८३ रूग्णांना मोफत चष्मे दिले. ४६ जणांची रक्त तपासणी, ५६ जणांची ईसीजी केली. याच शिबिरात ११ जणांनी रक्तदान केले. शिबिरातून गरजू रूग्णांवर मोफत शस्त्रक्रिया केल्या जातील, अशी माहिती डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली. यावेळी सरपंच, पदाधिकार्यांनी पान २ वर...

### दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देऊ:डॉ. क्षीरसागर

स्व.केशरकाकू क्षीरसागर यांचा समाजसेवेचा वारसा मी व डॉ.सारिका ह्या चालविण्याचा प्रयत्न करत आहोत. शिरूर कासार तालुक्यातील जनतेचे आणि क्षीरसागर कुटुंबियांचे अनेक वर्षांचे ऋणानुबंध आहेत. ग्रामीण भागात दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहे, असे प्रतिपादन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

## बीडमध्ये सत्कार सोहळ्याचे आयोजन!

नियोजन :पप्पू कागदेंच्या प्रमुख उपस्थितीत बैठक



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मंत्री रामदास आठवले यांची केंद्रीय मंत्री मंडळात तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने रामदास आठवले यांचा बीड शहरातील भव्य सत्कार सोहळ्याच्या पूर्व तयारीसाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार (दि.२८) सप्टेंबर शनिवार रोजी सायंकाळी ६ वाजता बीड शहरातील चर्मकार समाज बांधवांची गुरु रोहिदास समाज मंदिर चांभारवाडा जुना पुल बीड येथे शेकडो चर्मकार समाज बांधवांच्या उपस्थितीत बैठक संपन्न झाली. या बैठकीस राजू जोगदंड, किसन तांगडे, मायाताई मिसळे, प्रभाकर चांदणे, अविनाश जोगदंड,विलास जोगदंड आदी उपस्थित होते. केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी दलित पँथरपासून चर्मकार समाज बांधवांच्या न्याय व हक्कासाठी संघर्ष केला. चर्मकारावरील अन्याय पान २ वर...